गद्यपद्यार्थबोध.

भाग ३

अथवा

नवीन मराठी तिसऱ्या पुस्तकांतील कठिण शब्दांचे अर्थ व कवितांचें सान्वय स्पष्टीकरण.

धडा १.

चीनदेश (वि. ना.)—हा देश एशिया खंडात हिंदुस्थानचे ईशान्येस आहे.

व्यापारी (ना.)—माल घेऊन विकणारा.

प्रामाणिकपणा (भा. ना.)—सचोटी, खरेपणा. [असा

प्रसिद्ध (वि.)—सर्वांस ठाऊक

गट (ना.)—लगडी.

अनायत (क्रि. वि.)—मोघम.

उपद्रव (ना.)—रोग.

विचार (ना.)—काळजी, चिंता.

लोभ (ना.)—पसा, थांग.

खबर (ना.)—बातमी, वर्तमान.

मिळून (भा. अ.)—मिळून.

उगीच (क्रि. वि.)—उगाच.

वर्तमान (ना.)—घडलेली गोष्ट.

स्वाधीन (क्रि. वि.)—(स्व+आधीन) हवाली, ताब्यांत.

फळ (ना.)—परिणाम.

त्यास फळास आला—त्याला फळ मिळालें.

सद्गुणी (वि.)—(सत्+गुणी) चांगल्या गुणाची.

चतुर (वि.)—शहाणी, हुशार.

प्रधानकीचीं वस्त्रें—प्रधान हा राजाचा मुख्य दिवाण होय. त्याला दिवाणगिरीचा अधिकार देतेवेळीं बहुमानाचा पोषाक देतात त्याला प्रधानकीचीं वस्त्रें असें म्हणतात.

कारभार (ना.)—मुख्य अधिकार.

दक्षता (भा. ना.)—हुशारी.

धडा २.

प्रकाश (ना.)–उजेड. [गी.
दुःखाची–वाईट वाटण्याजो-
अवस्था (ना.)–स्थिति, दशा.
बापडा (ना.)–गरीब.
प्राप्त झाली–मिळाली.
इच्छा (ना.)–मर्जी, हेतु.
अंधारकोठडी (ना.)–काळो-
खाची खोली.
कोंडणें (क्रि.)–अडकवणें.
शाबूत (वि.)–सुरक्षित, धड.
उपकार (ना.)–कृपा.
तारे(ना.)–नक्षत्रें. [पोकळी.
आकाश (ना.)–आभाळ,
कुरण (ना.)–गुरांनांखाण्या-
करितां राखून ठेवलेली
गवताची जागा. [जागा.
माळ (ना.)–मैदान, सपाट
बागडणें (धा. ना.)–खेळणें.
उगवतें (क्रि)–रुजतें, उत्पन्न
होतें. [झाडें.
झुडपें (ना.)–लहान लहान
चमत्कारिक (वि.)–नवल
वाटण्याजोग्या. [लग.
सोयरींधायरीं (ना.)–नात-
हाय हाय (अ.)–अरेरे.

जग (ना.)–सृष्टि. [मती.
योग्य (क्रि. वि.)–ठीक, वा-

धडा ३.

घड्याळ (ना.)–वेळ दाखवि-
णारी वस्तु.
वर्तुळाकार (वि.)–(वर्तुळ+
आकार,वर्तुळ म्हे० वाटोळा)
–वाटोळ्या आकृतीचें.
तकट (ना.)–तबक, पत्रा.
रोमन (वि.)–रूम देशांत
राहणारे.
साह्य (ना.)–मदत.
मिनिट (ना.)–६० सेकंदांचें
एक मिनिट होतें व एक
सेकंद आपल्या नाडीच्या
एका ठोक्याबरोबर असतो
चक्र (ना.)–चाक.
आर्जव (ना.)–विनवणी,
खुशामत. [लहानशी.
हलकी (वि.)–क्षुल्लक,
अज्ञानी (वि.)–अडाणी.
कांहीं माहीत नाहीं असें
(अ=नाहीं.)
कज्जा (ना.)–काज.

धडा ४.

सिंहलद्वीप (वि. ना.)–हें

बेट हिंदुस्थानच्या अगदीं दक्षिणेस आहे.
उत्पत्ति (ना.)–उत्पन्नहोणें.
अरण्यें (ना.)–रानें, जंगलें.
मळे (ना.)–बागायतीची जमीन.
साल (ना.)–कवची.
मुळी (ना.)–पाळ. [लोक.
डच (ना.)–हालंददेशांतील
इतर (वि.)–परकी, दुसरा.
मक्ता (ना.) कांहीं रुपये देण्याचा ठराव करून सर्व मालकी आपणांकडे घेणें यास मक्ता म्हणतात.
दर (ना.)–भाव.
बंदोबस्त (ना.)–व्यवस्था, तजवीज. [झाड.
रोपा (ना.)–लहान कोंवळें
शासन (ना,)–शिक्षा.
कमाविलें (क्रि.)–मिळविलें.
अलीकडे (क्रि.वि.)–हल्लीं.
हस्तगत (क्रि.वि.)–स्वाधीन.
प्रभात (ना.)–चाक,वहिवाट.
उपयोगीं (क्रि.वि.)–कामीं.
बंती (ना.)–ओकारी, उलटी.

काढा. (ना.)–औषधी पदार्थ अतिशय काढवून आट विलेलें पाणी.
उपद्रव (ना.)–आजार.
वात (ना.)–वायु.
विकृति (ना.)–आजार.
अर्क (ना.)–पदार्थ अतिशय कढवून त्यापासून निघालेली वाफ सांठवून तिचें केलेलें पाणी.
उपजीविका(ना.)पोटभरणें, निर्वाह.

धडा ५.

सुरू झाला–आरंभ झाला.
सोन्यासारखा हात–सूर्याचे किरण अगदीं सकाळचे प्रहरीं सोन्यासारखे पिंवळट दिसतात. एथें हात, म्हणजे किरण.
उठवितो (क्रि.)–जागें करितो.
त्वां (स.)–तूं.
स्नान (ना.)–आंघोळ.
थकणें (धा.)–दमणें.
थांबणें (धा.)–विसावा घेणें.

चकचकीत (वि.)—लख-लखीत.

मुकुट (ना.)—किरीट,टोप. सूर्याचे किरण फांकले म्हणजे त्यांचें तेज त्याच्या अंगाभोंवतीं वेष्टनाप्रमाणें शोभतें त्याला मुकुट म्हटलें आहे.

प्रभा (ना.)—प्रकाश, तेज.

सर्वत्र(क्रि.वि.)—जिकडे तिकडे. [करणें.

पिकविणें (क्रि.)—उत्पन्न

ढग (ना.)—उन्हाळ्यांत पाण्याची वाफ होऊन ती आकाशांत जमून राहते तिला ढग म्हणतात, मेघ.

रुपेरी ढग (ना.)—पलीकडे सूर्य असतांमध्यें असणारीं पातळ ढगें रुप्यासारखीं पांढरीं दिसतात तीं.

रुपेरी ढगांच्या शेल्यानें डोकें गुंडाळितों—माझ्या डोक्यासभोंवतीं पांढरीं ढगें येतात तेव्हां त्या पांढऱ्या शेल्यानें मी डोकें गुंडाळलें आहे असें भासतें.

दिपविणें (क्रि.)—प्रकाशानें डोळ्यावर अंधारी येणें व न पाहवणें.

घार (ना.) हा एक अतिशय उंच उडणारा पक्षी आहे. [नजर.

टक (ना.)—एकसारखी

दिवस करणें—पृथ्वीवर प्रकाश पाडणें. [ग्रास येणें.

सामोरा येणें (धा.)—भेटाव-

सुंदर (वि.)—कानाला गोड लागणारें, चांगलें.

गायन (ना.)—गाणें.

घुबड(ना.)—एकपक्षी आहे.

पाकोळी(ना.)एकपक्षी आहे.

ढोल(ना.)—पोकळ जागा.

फट (ना.) चीर, भेग.

सिंह (ना.)—हा सर्व पशूंचा राजा आहे.

गुहा (ना.)—डोंगर, जमीन वगैरेंतील पोकळ जागा. बीळ. [पाहितों.

प्रकाशतों (क्रि.)—डोळे

तेजस्वी (वि.)—चकचकीत.

अरबस्तान (वि. ना.)—हा आरब लोकांचादेश प-

शिया खंडांत हिंदुस्थानं-च्या पश्चिमेस समुद्राच्या पलीकडे आहे. येथील घोडे फार प्रसिद्ध आहेत. धडा ४, पुस्तक दुसरें पहा.

इंग्लंद (वि. ना.)–हा देश यूरोप खंडाच्या वायव्येस असून हिंदुस्तानापासून सुमारें ६,००० मैलांवर आहे. येथील इंग्लिश लोक हे हल्लीं या आपल्या हिंदुस्तानावर राज्य करित आहेत. इंग्लंद देशाला विलायत असेंही म्हणतात.

धडा ६.

म्हातारा (वि.)–चाळीस वर्षांवर ज्याचें वय तो.

ओझें (वि.)–भार.

सहवर्तमान (अ.)–बरोबर घेऊन. [देणें.

पाय झिजविणें–पायाला त्रास

आळशी (वि.)–सुस्त, मंद.

थेरडा (वि.)–म्हातारा. (हा शब्द वाईट अर्थी योजितात).

खुद (क्रि. वि.)–स्वतःचा.

निर्दयपणानें (भा. ना.)–दया न करितां.

लादणें (धा.)–अतिशय ओझें घालणें.

वाहून (धा.सा.अ.)–उचलून.

सहज (क्रि. वि.)–मुळींच श्रम न पडतां. [काणीं.

एकत्र (क्रि. वि.)–एके ठि-

वांसा (ना.)–लांब व बारीक लांकूड अथवा वेळू.

पूल (ना.)–नदीच्या एका कांठावरून दुसऱ्या कां-ठाका जाण्याकरितां वरून लांकडी किंवा दगडी केलेला रस्ता असतो तो.

थवा (ना.)–झुंड, समुदाय.

अति कृपाळूपणा–फार लाड.

निसटला (क्रि.)–चटकन सुटला.

संतुष्ट करणें–खुशी करणें.

वरता (अ.)–शिवाय.

खेद (ना.)–दुःख. [परत.

माघारा (क्रि. वि.)–उलट,

तडक (क्रि.वि.)–झपाट्यानें, मध्यें कोठेंही न थांबतां.

धडा ७. कविता.

परमेश्वराची प्रार्थना.

कवितेतील शब्दार्थ.

परमेश्वर (परम+ईश्वर)—परम म्ह० श्रेष्ठ व ईश्वर म्हणजे सत्ता चालविणारा, यावरून सर्वांहून श्रेष्ठ व ज्याला उत्पत्ति व नाश हीं नाहींत व सर्व विश्वाला उत्पन्न करणारा असा पुरुष. [मागणें.

प्रार्थना (ना.)—विनंति,

आस (ना.)—आशा, इच्छा.

दयानिधि (ना.)—दया म्ह० ममता व निधि म्ह० समुद्र; यावरून दयेचा केवळ समुद्र म्ह० ज्याच्या पोटांत फार दया आहे असा, फार ममताळू. [शक्ति.

बुद्धि (ना.)—जाणण्याची

दुष्ट (वि.)—वाईट.

वासना (ना.)—इच्छा.

आवरीं (क्रि.)—आटपून धर.

माझिया—माझ्या.

देह (ना.)—शरीर.

रक्षिसी (क्रि.)—राखतोस.

पोशिशी (क्रि.)—पोषण करितोस.

ज्ञान (ना.)—समज, अक्कल.

तारिशी (क्रि.)—दुःखातून सोडवितोस, दुःखसागरातून पार नेतोस. [ळणें.

चाळविणें (धा.)—सांभा-

सृष्टि (ना.)—प्रत्येक उत्पन्न केलेली वस्तु; यावरून जग.

शक्ति (ना.)—सामर्थ्य.

बा (अ.)—अगा, हे (ईश्वरा.)

एक (अ.)—एकटा.

सर्वशक्ति (ना.)—ज्याची शक्ति सर्व ठिकाणीं चालते असा.

सर्वदेखणा (ना.)—सर्वांवर ज्याची नजर आहे असा.

जाणिजे (क्रि.) समजूं शकेल.

तूझिया—तुझ्या.

असे (क्रि.)—आहे.

कृपेवीण (वीण=शिवाय.)—कृपेशिवाय. [आधार.

आसरा (ना.)—आश्रय,

आहसी (क्रि.)—आहेस.

गति (ना.)--परिणाम, शेवट.	मति (ना.)--बुद्धि.
आम्हां--आम्हांस.	करां जोडुनी--हात जोडून.

मूळ कविता.

आस ही [१] तुझी फार लागली ॥ दे दयानिधे बुद्धि चांगली ॥
देउं तूं नको दुष्ट वासना ॥ तूंच आवरीं माझिया मना ॥ १ ॥

अन्वयः-दयानिधे, तुझी आस ही फार लागली, चांगली बुद्धि दे. तूं दुष्ट वासना देउं नको. माझिया मना तूंच आवरीं.

अर्थः-हे कृपासागरा (परमेश्वरा,) तुझी आशा मला फार लागली आहे, म्हणजे माझें सर्वलक्ष तुझ्याकडे फार लागलें आहे. तूं मला चांगली बुद्धि दे. तूं माझ्या मनांत वाईट इच्छा कधींही येउं देउं नकोस. जर माझें मन वाईट मार्गाकडे जाउं लागलें तर त्याला तूं आटोपून धर व सन्मार्गाला लाव.

टीपः-१ चारही चरणांत दहा दहा अक्षरें सारखीं व्हावीं म्हणून 'ही' हा शब्द एथें उगीच घातला आहे. पण 'ही' आस म्ह०पुढील तिन्ही चरणांतील भाव, असाही अर्थ घेतां येईल. २ उत्तम ज्ञान, अथवा लोकांचें बरें करण्याविषयीं इच्छा. ३ वाईट मार्ग म्हणजे, चोरी, चहाडी, लबाडी इत्यादि करणें, मद्य पिणें, गांजा ओढणें इत्यादि व्यसनांत गुंग असणें

देह देउनी तूंच रक्षिशी ॥ अन्न देउनी तूंच पोशिशी ॥
बुद्धि देउनी काम सांगशी ॥ ज्ञान देउनी तूंच तारिशी ॥ २ ॥

अन्वयः--मूळ कवितेप्रमाणें.

अर्थः-हे परमेश्वरा, आम्हांला शरीर देऊन त्याचें रक्षण तूंच करितोस; आणि अन्न देऊन त्याचें (शरीराचें) पोषणही तूंच करितोस व तसेंच आम्हांला बुद्धि देऊन (अमुक-

न्नादि मिळविण्याकरितां) उद्योग करावयास सांगतोस, व ज्ञान देऊन संसारदुःखांतून काढून उत्तमलोकांत आम्हांला नेतोस.

टीपः–१ पुष्कळ ज्ञान झाल्यावांचून परमेश्वराचें पूर्ण स्वरूप कोणाचेंही लक्षांत यावयाचें नाहीं. व पूर्ण स्वरूप लक्षांत आलें म्हणजे परमेश्वरप्राप्ति झाली असें समजावयाचें.

वागवावया सर्व सृष्टीला ॥ शक्ति या असे एक तूजला ॥
सर्वशक्ति तूं सर्व देखणा ॥ कोण जाणिजे तूझिया गुणा ॥ ३ ॥

अन्वयः—या सर्व सृष्टिला वागवावया एक तूजला शक्ति असे. तूं सर्वशक्ति, सर्व देखणा, तूझिया गुणा कोण जाणिजे?

अर्थः—हे ईश्वरा, सर्व जगाचा सांभाळ करण्याचें फक्त तुझ्याच अंगीं कायतें सामर्थ्य आहे. तुझें सामर्थ्य प्रत्येक ठिकाणीं चालतें व सर्व लहान थोर वस्तूंवर तुझी सारखी नजर आहे. अशा प्रकारचे तुझ्या अंगचे गुण हे कोणाला कळणार आहेत?

माणसें अम्ही सर्व लेकरें ॥ मायबाप तूं हें असें खरें ॥
तूझिया कृपेवीण ईश्वरा ॥ आसरा आम्हां नाहिं दुसरा ॥ ४ ॥

अन्वयः—अम्ही सर्व माणसें लेकरें, तूं मायबाप हें खरें असे; ईश्वरा, तूझिया कृपेवीण अम्हां दूसरा आसरा नाहीं.

अर्थः—हे ईश्वरा, आम्ही सर्व मनुष्यें तुझीं मुलेंबाळें आहों, व तूं आमचा आईबाप आहेस हेंच खरें आहे. देवा, तुझ्या कृपेवांचून आम्हांस दुसरा कोणाचाही आधार नाहीं.

तूंच आहसी आमुची गती ॥ देइं आमुतें उत्तमा मती ॥
प्रार्थितों तुला जोडुनी करा ॥ हे दयानिधे कीं कृपा करा ॥ ५ ॥

अन्वयः—तूंच आमुची गती आहसी, हे दयानिधे, तुला करा जोडुनी प्रार्थितों कीं, कृपा करा (व) आमुतें उत्तमा मती देई.

अर्थः—हे ईश्वरा, आम्हांस तुझ्यावांचून दुसरी गति नाहीं,

म्हणजे तुजवांचून परिणामीं आह्मांस दुसरा कोणी उपयोगी पडत नाहीं, हे दयाळू देवा, आम्हीं हात जोडून तुझी प्रार्थना करितों कीं, तू आम्हांवर कृपा कर व आम्हांस चांगली बुद्धि दे.

धडा ८.

मूलस्थान (ना. मूल+स्थान.) –मूळचें ठिकाण.

कळप (ना.)–टोळी, थवा.

हुकमी (ना.)–आज्ञाधारक.

निभावणीचा (वि.)–कोणत्याही संकटांतून पार पडण्यासारखा.

चतुष्पाद (वि.)–(चतुः+पाद.) चार पायांचीं.

बांधेसूद (वि.)–ज्यांच्या शरिराची ठेवण फार सुरेख असते ती. [री असणें

उत्साह (ना.)–आंगांत हुशा-

प्रौढ (वि.)–भव्य.

पाणीदार (वि.)–गरगरीत असून फार तेजस्वी. [केंस

ओघळ (ना.)–मानेवरील

चलाख (वि.)–चपळ.

दमदार (वि.)–धीर धरणारा, शेवटपर्यंत टिकणारा.

[illegible] (वि.)–[illegible]

भरधांवचाल (ना.)–चारही पायांवर धांवणें. [रणपणें-

सामान्यतः (क्रि. वि.)–साधा-

निरुपद्रविक (वि.)–कोणाला काही त्रास न देण्यासारखा. [लोक.

वाटसरू (ना.)–प्रवासी

खोळंबा (ना.)–हरकत.

दुलाच्या (ना.)–दुगाण्या.

रवंथ करणें–गाई, बैल वगैरे जनावरांची अशी रीति आहे कीं, तीं पुष्कळ चारा आपल्या पोटांत भरून घेतात व नंतर त्यांतील थोडा थोडा तोंडांत आणून चवळीत बसतात. त्यास रवंथ करणें ह्मणतात.

सबर होणें–गाभण होणें.

प्रायः (क्रि. वि.)–बहुत करून.

धडा ९.

लागवडीस येणें (क्रि.)–पिकास–लागास येणें.

उत्कृष्ट (वि.)—उत्तम.
प्रतिवर्षी (ना.)—प्रत्येक
सरदी (ना.)—थंडी. [वर्षास
महाग असणें (क्रि.)—दर
येणें, किंमत वाढणें,
बहुतकरून (क्रि. वि.)—
फारकरून [स्थान.
भरतखंड (वि. ना.)—हिंदु-
प्रदेश (ना.)—मुलुख
आपोआप (क्रि. वि.)—बीं
वगैरे न पेरतां, सहज.
समय (ना.)—हंगाम. [ळा.
पर्जन्यकाळ (ना.)—पावसा-
दमट (वि.)—थोडें, ओलें,
गट्ठे (ना.)—ओझीं. [ओलसर.
स्वादिष्ट (वि.)—रुचकर,
सुवासिक.

धडा १०,

विरळा (क्रि. वि.)—क्वचित्
प्रत्यक्ष (वि.) (प्रति+
अक्ष म्ह० डोळा)—
डोळ्यासमोर, साक्षात्.
साधन (ना.)—उपाय.
वहमा (ना.)—अंदेशा, संशय.
वेंटाळून (धा. अ.)—गुंडाळून.
गच्च (क्रि.वि.)—घट्ट, मजबूत.
बिळ (ना.)—भोंक.

धडा ११.

बहिरी (वि.)—जीस ऐकूं येत
नाहीं अशी. [नाहीं अशी.
मुकी (वि.)—जीस बोलतां येत
सरदार (ना.)—बडा गृहस्थ.
अनुकरण (ना.)—दुसऱ्याप्र-
माणें आपण कृति करणें.
अजीबाद (क्रि.वि.)—अगदीं.
वयांत येणें—तारुण्याच्या
ऐन भरांत येणें. [मुलगी.
नवरी (ना.)—लग्न व्हावयाची
नवरा (ना.)—लग्न व्हावयाचा
मुलगा. [चालविणारा भट.
उपाध्या (ना.)—धर्मक्रिया
जीव कीं प्राण करीत असे.
त्याच्यावर ती इतकी
ममता करी कीं, ती
त्याला आपल्या प्राणा-
पलीकडे समजत असे.
मोलकरीण (ना.)—मोल
घेऊन घरांतील काम-
काज करणारी बाई.
उद्देश (ना.)—हेतु. [घालून.
डोकावून (धा.)—आंत डोकें
गाढ (वि.)—सुस्त.

ठार मारणें—जिवें मारणें.
अडाण (वि.)–नशिकलेल्या.
कुढ्यामनाचें (वि.)—आंतल्या गांठीचें, कुजक्या मनाचें.
संभव (ना.)—अजमास.
आवाज (ना.)—शब्द.
दचकून (धा.)—घाबरून.
मावेना. (क्रि.)—राहीना.
पोटांत आनंद मावेना, इ०—फार आनंद झाला, म्हणजे त्या आनंदाच्या उकळ्या पोटांत न राहतां बाहेर फुटूं लागतात. त्यावरून आनंदभरित झाली असा अर्थ.
स्तुति (ना.)—प्रार्थना.
आशय (ना.)—हेतु.
दुर्दैव (ना.)—कमनशीब.
प्रसाद (ना.)—अनुग्रह, कृपा.
मनोरंजक (वि.)—मनास आनंद देणारी.

धडा १२.

भक्ष्य (वि.)—खाण्यास योग्य.
खचित (क्रि.वि.)—खरोखर.
नाजूक (क्रि.वि.)—कसबाचें, कठीण.
बनतात (क्रि.)—तयार होतात. [कांदे.
कंद (ना.)—झाडांचीं मुळें,
शेवाळ (ना.)—पाण्यांत वापर नसल्यामुळें आंत जी बारीक हिरवी वनस्पति उगवते ती.
बुंद (ना.)—लहान फळें ज्यांस हल्लीं सर्वत्र काफी असें म्हणतात.
प्रयोजन (ना.)—कारण.
खोदणें (धा.)—पोखरणें.
कवच (ना.) साल.
मगज (ना.)—गीर.
रोडगा (ना.)—गव्हांच्या पिठाचा वाटोळा गोळा गोवऱ्यांवर भाजून काढला म्हणजे रोडगा बनतो.
बुरसणें (धा.)—पदार्थ फार दिवस राहिल्यानें त्यावर जेव्हां पांढरा कापूस येऊन बिघडतो तेव्हां त्यास बुरसणें असें म्हणतात.
प्रतिष्ठा (ना.)—योग्यता.
इष्टमित्र (ना.)—सोयरेधायरे, स्नेही इ०.

धडा १३.

प्रत (ना.)–प्रकार तऱ्हा.

चोड (ना.)–माडावरून काढलेल्या नारळाची जाड साल. (तिचा काथ्या करितात.)

करवंटी (ना.)–नरटी.

आंकडी (ना.)–काठीचा दांडा सरळ असून तिच्या शेवटास डाहाळी वगैरे बांकविण्याकरितां बांकडी केलेली असते ती.

बांबू (ना.)–वेळू.

साटी (ना.)–ताटी.

आंच (ना.)–उष्णता.

थैली (ना.)–पोतें.

बासुंदी (ना.)–मसाल्याचें आटीव दूध.

तऱ्हेतऱ्हेचा (वि.)–नाना-प्रकारचा.

धडा १४.

प्रचार (ना.)–चाल.

पहाडी (वि.)–डोंगरी.

पुंजका (ना.)–झुबका.

बेढब (वि.)–ओबडधोबड.

ढबदार (वि.)–डौलदार.

सोशिक (वि.)–सोसून घेणारें [समज नाहीं असें.

निर्बुद्ध (वि.)–ज्याला काहीं

हेंकड (वि.)–हट्टी, हेकेखोर.

कर्कश (वि.)–ऐकण्याला फार कठोर. [भावाचीं.

जहाल (वि.)–रागीट स्वा-

स्वच्छ (वि.)–निर्मळ.

लवचीक (वि.)–एकाएकी न तुटणारें.

धडा १५ कविता.

मुलांस उपदेश (अभंग.)

कवितेंतील शब्दार्थ.

कोणासंगें–कोणाबरोबर.

अनवाणी (क्रि.)–पायांत कांहीं घातल्याशिवाय.

साक्ष (ना.)–(स+अक्ष)= असुक गोष्ट स्वतः डो-ळ्यांनीं बघितली याब-द्दल शपथेवर सांगणें.

जामिन(ना.)-दुसऱ्याचा करार

आपण स्वतःपुरा करणें.
चित्त (ना.)—मन, अंतःकरण.
बोल (ना.)—शब्द.
कल्याण (ना.)—हित, बरें.
भजावें (क्रि.)—स्तवन करावें.
वंदावें (क्रि.)—नमस्कार करावा. [पूर्वक, भक्तीनें.
जीवेंभावें (ना.)—अंतःकरण-
वडील (ना.)—आईबाप,किंवा दुसरा पाळन करणारा.

नेमिलेल्या (धा. अ.)—ठर-विलेल्या. [कोणी एक वृक्ष.
विद्यावृक्ष (ना.)—विद्या हाच
आयुष्य (ना.)—वय.
दंडवत (ना.)—नमस्कार.
आपुलालें—आपआपलें.
चिंतन (ना.)—ध्यान.
भाव (ना.)—भक्ति.
होय (क्रि.)—आहे.
व्यापार (ना.)—धंदा.

मूळ कविता.

शिवी कोणा देऊं नये ॥ कोणासंगें भांडूं नये ॥ १ ॥
अनवाणी चालूं नये ॥ चालतांना धांवूं नये ॥ २ ॥
खोटी साक्ष देऊं नये ॥ जामिन कोणा होऊं नये ॥ ३ ॥
दुसऱ्याचें चोरूं नये ॥ खोटें कधीं बोलूं नये ॥ ४ ॥
गोड फार खाऊं नये ॥ पाहिलें तें मागूं नये ॥ ५ ॥
चित्तीं धरी जो हे बोल ॥ त्याचें कल्याण होईल ॥ ६ ॥

अन्वयः—पहिल्या पांच ओळींचा अन्वय सारखाच आहे म्हणून लिहिला नाहीं. शेवटच्या ओळीचा ' जो हे बोल चित्तीं धरी, त्याचें कल्याण होईल.

अर्थः—मुलांनो, कोणाला शिवी देऊं नये; व कोणाबरोबर तंटा करूं नये, पायांत जोडा वगैरे कांहीं घातल्याशिवाय चालूं नये; व चालतांना धांवूं नये; आपणांस जें माहीत असेल त्याच्या उलट सांगूं नये; व कोणत्याही कामांत दुसऱ्याचा जिमा आपण घेऊं नये; दुसऱ्याची वस्तु त्याला कळविल्यावांचून घेऊं नये; व कधीं खोटें बोलूं नये;

गोड पदार्थ फार खाऊं नये; दुसऱ्याच्या हातांत जी वस्तु दृष्टीस पडेल ती मागण्याचा हट्ट घेऊं नये; जो मुलगा हे वरील उपदेशाचे शब्द ध्यानांत ठेवील त्याचें खचित बरें होईल.

अभंग.

सकाळीं उठोनी देवासी भजावें ॥ गुरूसी वंदावें जीवेंभावें ॥ १ ॥
वडिलांची आज्ञा घेतल्यावांचून ॥ कोठें घरांतून जाऊं नये ॥ २ ॥
शाळेसी जातांना मुलांनीं वाटेंत ॥ तमाशा पाहात राहूं नये ॥ ३ ॥
नेमियेल्या वेळीं शाळेमध्यें जावें ॥ चित्त तें ठेवावें विद्येवरी ॥ ४ ॥
बाळपणीं विद्या-वृक्षासी लावावें ॥ तरुणपणीं घ्यावें फळ त्याचें ॥ ५ ॥

अन्वयः—सकाळीं उठोनी देवासी भजावें, जीवें भावें गुरूसी वंदावें, वडिलांची आज्ञा घेतल्यावांचून घरांतून कोठें जाऊं नये. मुलांनीं शाळेसी जातांना वाटेंत तमाशा पाहात राहूं नये. नेमियेल्या वेळीं शाळेमध्यें जावें, चित्त तें विद्येवरी ठेवावें. बाळपणीं विद्या वृक्षासी लावावें तरुणपणीं त्याचें फळ घ्यावें.

अर्थः—सकाळीं उठून परमेश्वराची प्रार्थना करावी, व मोठ्या प्रीतीनें गुरूला नमस्कार करावा. आई, बाप वगैरे वडील माणसांची परवानगी घेतल्यावांचून मुलांनीं घरांतून कोठेंही बाहेर जाऊं नये. मुलांनीं शाळेंत जातेवेळीं रस्त्यांत खेळ पहात उभें राहूं नये. ठरविलेल्या वेळीं शाळेमध्यें जावें, आणि आपलें सर्व लक्ष विद्या शिकण्याकडे असूं द्यावें. झाड लाविल्यावर मोठेपणीं जशीं त्यास फळें येतात, त्याचप्रमाणें विद्या हेंच कोणी झाड तें लावणें म्हणजे, लहानपणीं विद्या शिकणें व ती शिकून तुम्ही मोठे झालां म्हणजे, त्यापासून तुमच्या विद्यावृक्षास सन्मान व अब्रू मिळणें, तसेंच द्रव्य वगैरे मिळणें या रूपानें फळें येतील तीं तुम्हीं घ्यावीं.

अभंग तुकारामाचे.

आतां तरी पुढें हाचि उपदेश ॥ नका करूं नाश आयुष्याचा ॥ १ ॥
सकळांच्या पाया माझे दंडवत ॥ आपुलालें चित्त शुद्ध करा ॥ २ ॥
हित तें करावें देवाचें चिंतन ॥ करूनियां मन शुद्ध भावें ॥ ३ ॥
तुका म्हणे हित होय तो व्यापार ॥ करा काय फार शिकवावें ॥४॥

अन्वयः–आतां तरी पुढें आयुष्याचा नाश करूं नका हाची उपदेश; सकळांच्या पाया, माझे दंडवत आपुलालें चित्त शुद्ध करा; मन शुद्ध करूनियां भावें देवाचें चिंतन करावें तें हित; तुका म्हणे, हित होय तो व्यापार करा, फार काय शिकवावें.

अर्थः–अहो, आजपर्यंत आयुष्य व्यर्थ गेलें तें गेलें, परंतु यापुढें तरी आपलें वय व्यर्थ घालवूं नका, हाच उपदेश मला तुम्हांस करावयाचा आहे. मी सर्वांचे पायावर डोई ठेवून विनंति करितों कीं, आपलें मन शुद्ध करा. मन शुद्ध करून भक्तीनें देवाचें ध्यान करावें हेंच आपलें हित आहे. तुकाराम म्हणतात, ज्या धंद्यांत आपलें हित आहे तोच धंदा करा, यापेक्षां फार काय शिकवावें?

टीपाः—१ 'मन शुद्ध करणें' म्हणजे दुसऱ्याचें अनहित करणें, मनांत राग येऊं देणें, दुसऱ्याचें द्रव्य हरण करणें, इत्यादि मनांतील वाईट विचार टाकून देणें हें होय. २ तुकारामाचे मनांत 'परमार्थ साधन करून आपलें हित करून घेणें' हाच 'व्यापार' या शब्दाचा अर्थ असावा असें दिसतें.

धडा १६.

वर्ण (ना.)–रंग. [पहिले.
मूळचे (वि.)–पूर्वींचे,
झोंपडी (ना.)–लहान घर, खोपटी.
तों (अ.)–इतक्यांत.

हरण (ना.)–एका जातीचें कोमल व अति चपल जनावर.
रांगून ठेवणें–लोंबत ठेवणें.
माग (ना.)–शोध, पत्ता.
पाठलाग(ना.) शोध लावण्याकरितां पाठीस लागणें.
ठेंगणा (वि.)–खुजा.
लांडा (वि.)–ज्याची शेंपटी आंखूड आहे तो.
वर्णन केलें–अमुक अमुक प्रकारचा आहे म्हणून सांगितलें.
बारकाईनें (ना.)–बारीक रीतीनें.
प्रत्युत्तर (ना.)–(प्रति+उत्तर)=उलट जबाब.
रास (ना.)–ढीग.
लागलीं (क्रि.)–उमटलीं.
गुंतला (क्रि.)–अडकला, निमग्न झाला.

धडा १७.

प्रकार (ना.)–जाती.
फुलूं लागणें (धा.)–फुलें येऊं लागणें.
तुरट (वि.)–गोड व आंबट ह्या दोहोंचे मधची चव.
अस्सल (वि.)–उत्तम.
छाया (ना.)–सांवली.
पौष्टिक (वि.)–अंगांत शक्ति आणणारें, पुष्टिकारक.
स्वच्छता (भा. ना.)–निर्मलपणा, मल नसणें.
बळकट (वि.)–मजबूत.

धडा १८.

आसमंतात (क्रि. वि.)–आसपास, सभोंवतीं.
नरम (वि.)–मऊ.
चोळली (क्रि.)–घांसली.
कठीण (वि.)–टणक.
जंत (ना.)–एक प्रकारचे किडे (फार गोड खाल्ल्यानें पोटांत एकप्रकारचे किडे उत्पन्न होतात; ते बहुतकरून लहान मुलांच्या पोटांतच फार होतात.)
तद्देशीय (वि.)–(तत+देशीय)=त्या देशांतील.
लागास येणें–फळें येणें.
थट्टा (ना.)–मस्करी, विनोद.
भाक्षिलीं (क्रि.)–खाल्लीं
उचित (क्रि. वि.)–योग्य.
हरएक (वि.)–प्रत्येक.

धडा १९.

हारीनें (ना.)–ओळीनें, रांगेनें.
तंतु (ना.)–दोर.
खुडून (धा.)तोडून.
उंच प्रतीचें–उत्तम प्रकारचें.
बिघडतें (क्रि.)–नासतें.
कोंब (ना.)–मोड.
सुवास (ना.)–(सु+वास) सु=चांगला म्हणून 'चांगला वास.
खोड (ना.)–तुकडा,करवा.
नीटनेटकीं (वि.)–ओबडधोबड दिसत नाहींत अशीं ; साफसूफ.
वजन (ना.)–जडपणा.
करंडे (ना.)–डबे.
उगाळून (धा. अ.)–घांसून.
प्रेतें (ना.)–मढीं.
गुण येणें–बरें होणें.
सुगंध (ना.)–चांगला वास.

धडा २०.

मानवी (वि.)–मनुष्याचें.
संबंध (ना.)–नातें.
चौक(ना.) जेथें चार रस्ते मिळतात ती जागा,चवाठा.
गांठ पडते–भेट होते.
चावडी (ना.)–गांवाच्या मध्यभागीं सरकारी कामाकरितां बांधिलेली जागा, चौकी.
हरप्रसंग (ना.)–प्रत्येकवेळ.
स्थळ (ना.)–जागा.
प्राय: (अ.)–बहुतकरून.
बोली (ना.)–भाषा.
एकोपा (ना.)–एकमत, एकी.
युद्ध (ना.)–लढाई.
सल्ला (ना.)–मैत्री, तह.
महाद्वीपें (ना.)–मोठीं बेटें.
वारुळ (ना.)–मुंग्यांचें घर.
गजबजणें (क्रि.)–दणदणणें.
कडाका (ना.)–कहर. फार थंडी.
निवारण करणें–नाहींसें करणें.
द्राक्षारस (ना.)–द्राक्षाचा अर्क. हा अर्क दारूप्रमाणें किंचित् गुंगी आणणारा आहे.
मावळणें (धा.)–शांत करणें.
मेंढक्या (ना.)–मेंढरें राखणारा.
हबशीण (ना.)–हबशी देशांतील बायको.

दासीपणा (भा. ना.)- कैदेंतील माणसासारखी स्थिति. [दुःख कंठीत.
झुरत (धा. अ.)-झिजत,
बंदांतून (ना.)-बंदीशाळेंतून, तुरुंगांतून.
धांवा (ना.)-हांक मारणें, स्तुति करणें.
कान देणें-लक्ष देणें.
सार्वभौम राजा-सार्वभौम म्हणजे सर्व पृथ्वीचा; राजा म्ह० राज्यकरणारा; यावरून सर्व पृथ्वीवर राज्य करणारा असा अर्थ.
वरचढ (वि.)-श्रेष्ठ.
शेखी मिरवणें-डौल मारणें, आढ्यता आणणें.

घडा २१.

न्याय (ना.)-इनसाफ.
चातुर्य (भा.ना.)-शहाणपण.
लोटल्यावर (धा.)-गेल्यावर.
आडवेढे (ना.)-हरकती.
निरुपाय(क्रि. वि.)-(निर्+उपाय)=नाइलाज.
ऐवज (ना.)-पैका वगैरे जें त्यानें ठेविलें होतें तें.
ठेव (ना.)-अनामत ठेविलेला ऐवज. [अडचणी.
हरकती (ना.)-आडवेढे,
न्यायाधीश (ना.)[न्याय+अधीश]=इनसाफ करणारा.
फिर्याद केली-दाद मागितली.
मजकूर (ना.)-हकीगत.
निरपराधी (वि.)-(निर्+अपराधी)=निर्दोषी, अपराध नाहीं असा.
करार (ना.)-ठराव.
कुंठित (क्रि. वि.)-लाज उत्पन्न होऊन जास्ती बोलण्याचा मार्ग बंद होणें, स्तब्ध.

घडा २२.

दलदल (ना.)-चिखलाची जागा, पाणथळ जागा.
रगडून (क्रि. वि.)-खूप जोरानें.
पक्वाशय (ना.]-(पक्व+आशय)=अन्नाच्या पिशव्या.
पचन होणें-जिरणें.
चूण (ना.)-तूर वगैरेची डाळ काढून घेतल्यावर जें तूस राहतें तें.

कास } (ना.)–दुधाची
ओटी } पिशवी.
जुंपणें (क्रि.)–जोडणें.
चर्म (ना.)–चामडें.
अस्थि (ना.)–हाड.
मज्जा (ना.)–मेंदु.
स्नायु (ना.)–शरिरांतील मांसाचे दोराप्रमाणें लांब तंतु असतात ते.
शृंगें (ना.)–शिंगें.
वांयां (क्रि वि.)–फुकट.

धडा २३.

प्रामाणिकपणा (भा. ना.)–खरेपणानें वागणें.
सत्य (ना.)–खरें बोलणें.
ओघानें (ना.)-सहज, क्रमानें.
भेद (ना.)–निराळेपणा.
उदाहरणें(ना.) दाखले, दृष्टांत.
स्पष्ट (क्रि. वि.)–उघड.
धार्मिक (वि.)–धर्म करणारा.
वचन पाळणें–बोललेलें खरें करून दाखविणें.
त्याग करणें–सोडून देणें.
सारांश (ना.)–तात्पर्य.
गुजराथ (वि.ना.)–हा प्रांत मुंबई इलाख्यामध्यें आहे.
नामांकित (वि.)–प्रसिद्ध, प्रख्यात.
मुनीम (ना)–पेढीवरील सर्व कामकाज पाहणारा, दिवाण.
सावकार (ना.)जो लोकांस कर्जाऊ पैसे देतो तो.
पेढी (ना.)–दुकान.
भला (वि.)–प्रामाणिक.
पक्कें (क्रि.वि.)–पूर्णपणानें.
दौलत (ना.)–संपत्ति.
लौकिक (ना)–लोकांत मानमान्यता, कीर्ति, ख्याति.
आप्त (ना.)–संबंधी, नातलग. [शिकवूं लागणें.
बुद्धिभेद करणें–वाईट बुद्धि
लक्षावधि (वि.)–(लक्ष+अवधि)=लाखों.
घोळणें (धा.) खेळणें.
तळीराम गार करणें–घर भरणें, संपत्ति घेणें.
दुराचार (ना.)–(दुर्+आचार)=वाईट वागणूक.
विश्वासघात (ना.)–एखाद्याला तुझें काम करीन असा विश्वास देऊन आयतेवेळीं त्याला फसविणें.

नरक (ना.)–वाईट लोक.
ठकविणें (क्रि.)–फस-
विणें.
नित्यकर्म (ना.)–ज्याच्या-
विषयीं लोक निंदा कर-
तील असें काम.
सहसा (क्रि.वि.)–एकाएकीं.
निषेध (ना.)–धिक्कार.

धडा २४.

ईश्वराचें महत्त्व.

कवितेंतील शब्दार्थ

महत्त्व (ना.)–थोरपणा,
मोठेपणा. [वर्णन.
स्तुति(ना.)–प्रार्थना, गुणांचें
व्यर्थ (अ.)–फुकट.
नर (ना.)–मनुष्य.
पात्र (क्रि.वि.)–योग्य.
मानव (ना.)–मनुष्य.
ध्वनि (ना.)–आवाज, शब्द.
परिसतों (क्रि.)–ऐकतों.
पद (ना)–पाय.
जिव्हा (ना.)–जीभ.
रस (ना.)–गोडी.
वाचे (ना.)–वाणीनें. [रचें.
बहुसाळ (वि.)–नाना प्रका-
विश्रांति (ना.)–विसांवा.
फिरोनि (क्रि.वि.)–पुनः.
सत्ता (ना.)–हुकूम, आज्ञा.
प्रभु (ना.)–ईश्वर.
बळ (ना.)–जोर.
नभ (ना)–आकाश.
तरुलता(ना.) (तरु+लता)
झाडें आणि वेली.
पुष्प (ना.)–फुल.
समयीं (ना.)–वेळेवर.
वर्षाव (ना)–वृष्टि.
समृद्धि (ना.)–विपुलता.
भूमि (ना.)–जमीन.
अवघी (वि.)–सर्व.
सर्वज्ञ (ना.)–(सर्व+ज्ञ=
जाणणारा.) = प्रत्येक
वस्तु जाणणारा.
सकरुणा (ना.)–करुणे-
सहित, ज्याच्या पोटांत
दया आहे अशा.
अज्ञ(वि.)–अडाणी, अज्ञान.
सकल (वि.)–सर्व.

होशी (क्रि.)--आहेस.
कोप (ना.)--राग, अवकृपा.
करुणस्वर (ना.)--दीनवाणी.
विनवणें (क्रि.)--प्रार्थनाकरणें.

मूळ कविता.

स्तुती करावी परमेश्वराची ॥ करूं नये व्यर्थ कधीं नराची ॥
स्तुतीस कीं ईश्वर पात्र होतो ॥ तसा तिला मानव काय हो तो ॥ १ ॥

अन्वयः--परमेश्वराची स्तुती करावी; नराची (स्तुति) व्यर्थ, (वास्तव) कधीं करूं नये कीं, हो, ईश्वर स्तुतीस पात्र, तसा तिला तो मानव होतो काय?

अर्थः--आपण नेहमीं परमेश्वराचें चिंतन करून त्याची प्रार्थना करावी; मनुष्याची प्रार्थना केल्यानें कांहीं एक मिळणार नाहीं, यास्तव कधींही करूं नये. कारण, अहो ज्याप्रमाणें परमेश्वर स्तुति करून घेण्यास लायक आहे त्याप्रमाणें मनुष्य आहे काय?

टीपाः---१ परमेश्वर स्तुति करून घेण्यास कां लायक आहे हें. पुढील दोन श्लोकांवरून समजेल. वरील श्लोकांत 'स्तुति' याचा अर्थ फक्त 'गुणाची प्रशंसा करणें' असा नाहीं, तर 'गुणांचें उच्चारण करून त्या द्वारानें आपलें हित होण्यासाठीं विनंती करणें' असा आहे. अमुक मुलगा चांगला बुधिमान् आहे म्हणून त्याच्या गुणांची 'स्तुति' करणें हें निराळें व परमेश्वराची स्तुति करणें हें निराळें. २ 'कीं' याचा अर्थ 'कारण.' कवितेंत 'कारण' या शब्दाबद्दल याचा संक्षेप 'कीं' हा शब्द घालतात. गद्यांत बहुत करून 'कीं' हा शब्द 'कारण' अर्थी येत नाहीं. असें, 'तो' म्हणाला कीं मी जाईन.'-कीं हें व्याकरणांत उभयान्वयी अव्यय असें समजावें. ३. कवितेंत फक्त 'हो' हा शब्द 'अहो' याचा संक्षेप आहे. गद्यांत 'हो' अथवा 'होय' हें क्रियापद जाणावें.

कोकिळांनी मधुरों ध्वनी परिसतों कानीं पदीं चालतों ॥
जिव्हेनें रस चाखतों मधुरही वाचे अम्ही बोलतों ॥

हातांनीं बहुसाळ काम करितों विश्रांतिही घ्यावया ॥
घेतों झोप सुखें फिरोनि उठतों ही ईश्वराची दया ॥ २ ॥

अन्वयः—अम्ही डोळयांनीं बघतों, कानीं ध्वनीं परिसतों, पदीं चालतों, जिव्हेनें रस चाखतों, वाचे मधुरही बोलतों, हातांनीं बहुसाळ काम करितों, विश्रांतिही घ्यावया सुखें झोंप घेतों, फिरोनि उठतों ही ईश्वराची दया (आहे).

अर्थः—आपण आपल्या डोळयांनीं पाहतों; कानांनीं शब्द ऐकतों; पायांनीं चालतों; जिभेनें पदार्थांची चव घेतों; वाणीनें (तोंडानें) कानाला गोड लागणारे शब्द बोलतों; हातांनीं नानाप्रकारचीं कामें करितों; श्रम केल्यानंतर ते श्रम वाटूं नयेत म्हणून मोठ्या आनंदानें झोप घेतों व पुनः (निजून) उठतों. ही सर्व परमेश्वराची आपणांवर मोठी कृपा आहे.

टीपः—१. ह्या श्लोकांत निरनिराळया इंद्रियांचीं निरनिराळीं कामें सांगितलीं आहेत. 'कानीं' व 'पदीं' हे शब्द तृतीयेचा अनेकवचनी प्रत्यय 'ईं' हा लागून झाले आहेत, 'सुखें' हा शब्द तृतीयेचा एकवचनी प्रत्यय 'एँ' हा लागून झाला आहे. 'वाचे' या शब्दापुढें तृतीयेचा एकवचनी प्रत्यय 'नें' हा गुप्त आहे.

सत्तेनें प्रभुच्याच सूर्य उगवे त्याच्याचि सत्ताबळें ॥
वारा वाहतसे नभीं तरुलता देतात पुष्पें फळें ॥
पाण्याचा करितात मेघ समयीं वर्षाव भूमीवरी ॥
देते धान्यसमृद्धि भूमि अवघी त्याचीच सत्ता खरी ॥ ३ ॥

अन्वयः—प्रभुच्याच सत्तेनें सूर्य उगवे, त्याच्याचि सत्ताबळें नभीं वारा वाहतसे, तरुलता पुष्पें, फळें देतात, समयीं मेघ भूमीवरी पाण्याचा वर्षाव करितात, भूमि धान्यसमृद्धि देते, अवघी त्याचीच सत्ता खरी.

अर्थः—ईश्वराच्या हुकमानेंच (दररोज सकाळीं) सूर्य उगवतो, त्याच्याच अधिकारानें आकाशांत वारा वाहतो, झाडें

व वेली यांस फुलें व फळें धरतात, योग्य वेळीं (हंगामाचे सुमारास) ढग पृथ्वीवर पाण्याची वृष्टि करितात (पाऊस पडतो), व पाऊस पडल्यामुळें जमिनींत पीक चांगलें येऊन धान्याची विपुलता होते, हें सर्व त्याच्याच अधिकारानें होतें.

टीपाः–१ तृतीया. २ सप्तमी. ३ धान्यसमृद्धि—धान्याची समृद्धि ४ प्रत्येक घरांत बाप किंवा जो कोणी वडील मनुष्य असेल तो ज्याप्रमाणें घरांतील मुलेंबाळें, चाकरमाणसें इत्यादिकांवर अंमल चालवून त्यांच्याकडून संसारांतील सर्व कामें करवितो किंवा सरकार आपल्या कामगारांवर अंमल करून त्यांजकडून राज्याचीं सर्व कामें करवितें, त्याप्रमाणेंच ईश्वर हा सर्व वस्तूवर अंमल चालवितो.

ईश्वरास प्रार्थना.

सर्वज्ञा परमेश्वरा सकरुणा बापा दयासागरा ॥
आम्हीं अज्ञ मुलें तुझीं सकल हीं तूं बाप होशी खरा ॥
केला कां इतका अम्हांवरि तुवां देवा असा कोप हा ॥
हें आम्ही करुणस्वरें विनवितों आम्हांकडे तूं पहा ॥ ४ ॥

अन्वयः—सर्वज्ञा, सकरुणा, दयासागरा, बापा परमेश्वरा, हीं आम्हीं सकल तुझीं अज्ञ मुलें, तूं खरा बाप होशी. देवा, तुवां अम्हांवरि असा हा इतका कोप कां केला ? हें आम्हीं करुणस्वरें विनवितों, तूं आम्हांकडे पहा.

अर्थः—जगांतील प्रत्येक गोष्ट जाणणाऱ्या, कनवाळू व दयेचा केवळ समुद्रच अशा बापा, परमेश्वरा, आम्हीं सर्व मनुष्यें तुझीं अज्ञान मुलें आहों व तूं आम्हां सर्वांचा खरोखर बाप आहेस. देवा, तूं आम्हांवर इतका राग कां धरिलास ? आम्हीं मोठ्या दीनवाणीनें तुझी प्रार्थना करितों. या आमच्या प्रार्थनेकडे लक्ष दे व आम्हांवर राग धरूं नको.

टीपाः–१ तुवां ('तूं' ची तृतीया.) २ परमेश्वर हा खरोखर सर्व वस्तूचा उत्पन्नकर्ता आहे, म्हणूनच त्याचा व आपला संबंध बाप व मुलें हा आहे.

धडा २५.

सहल करणें–मौजेनें फिराव-
यास जाणें. [वांकलेली.
लादलेली (धा.)–भारानें
पाड (ना.)–पिकण्याचा वेळ.
कोतवाल (ना.)–चोरी, खून
वगैरे गुन्हे पकडणारा
अंमलदार.
पचलें (क्रि.)–जिरलें, उघड-
कीस आलें नाहीं.
पस्तावा (ना.)–वाईट गोष्ट
केल्याबद्दल मागून विचार
होतो तो, पश्चाताप.
उतावळी (ना.)–घाई.
कृपण (ना.)–चिक्कू.
आडून (धा.)–आड दडून
राहून. [तयार झालेले.
आलगलेले (धा.)–पिकून

धडा २६.

इंद्रियें (ना.)–नाक, डोळे,
कान इत्यादि अवयव.
स्पर्श (ना.)–शिवणें.
चव (ना.)–रुचि, गोडी.
हुंगणें (क्रि.)–वास घेणें.
कर्में (ना.)–कामें.
धर्म (ना.)–गुण.
देणगी (ना.)–मोलाची वस्तु.
धुरांडी (ना.)–धूर जाण्या-
साठीं राखलेलीं भोकें.
परवानगी (ना.)–मोकळीक.
हुकुमबंदा (वि.)–हुकुमानें
बांधून टाकलेला, सांगि-
तलेलें काम करणारा.
कोमेजणें (क्रि.)–टवटवी
जाणें, सुकणें.

धडा २७.

जनरल (ना.)–सैन्यावरील
मुख्य अधिकारी, सेनापती.
कुऱ्हाड कशी चालते तें पाहणें
–कुऱ्हाडीला धार कशी
आहे तें पाहणें.
हाणणें (धा.)–मारणें.
जायबंदी (क्रि. वि.)–कामां-
तून गेलेलें, निरुपयोगी.
दुर्दशा (ना.)–वाईट स्थिति,
नाश.
चौकशी (ना.)–विचारपूस.
गोंधळला (क्रि.)–गडबडला,
घाबरला.
गहिंवरला (क्रि.)–प्रेमानें
कंठ दाटून आला.
आवेश (ना.)–स्फुरण.

बाहु (ना.)-दंड, भूज.
बेटा (ना.)-मुला.

घडा २८.

उभयतां (वि.)-दोघे.
दिवाणखाना (ना.)-बैठकीची जागा.
ढकलिलें (क्रि.)-लोटिलें.
आळ (ना.)-कुमांड.
बळें (क्रि. वि.)-मुद्दाम, जाणून बुजून.
भाव (ना.)-अर्थ, हेतु.
याची वाट काय?-आतां पुढें कसें करावें? याची तोड कशी काय?
जणो आपण त्या गांवचींच नव्हो-जसें काय आपणांस त्या गोष्टीविषयीं कांहींच माहीत नाहीं.
मसलत (ना.)-युक्ति.
नाकबूक (क्रि. वि.)-खरी गोष्ट न कळविणें.
अमळसा (वि.)-थोडासा.
मुक्याचें व्रत घेतलें आहे-बोलावयाचें नाहीं असा, निश्चय केला आहे.
हुंदका (ना.)-स्फोट.

खोडी (ना.)-कळ. [नका.
स्वस्थ असा-काळजी करूं
तर बरीक-तर मात्र.

घडा २९.

यात्रा (ना.)-जत्रा. [येणें.
रमणें (धा.)-खेळत खेळत
वर्गणी (ना.)-पट्टी.
गरज (ना.)-जरूरी.
फळ (ना.)-उपयोग.
संवय (ना.)-चटक.
अंतर (ना.)-भेद.

घडा ३०.

कंद (ना.)-कांदे, गड्डे.
शोषून घेणें-ओढून घेणें.
खोड (ना.)-झाडाचा मधला जुनाट भाग.
टवटवी (ना.)-प्रफुल्लितपणा, तजेला.
देंठ (ना.)-कोंब.
नामी (वि.)-सुरेख. [झाड.
रोप (ना.)-अगदीं लहान
दम (ना.)-अवकाश, धीर.
बारीक दृष्टी लावून-लक्षपूर्वक.

घडा ३१.

कसबा (ना.)-मोठ्या वस्तीचा गांव.

मघां (क्रि. वि.)—थोड्या वेळापूर्वी.
कलम (ना.)—आंब्याची डाहाळी कापून ती दुसऱ्या आंब्याच्या रोप्याला सारखी बांधतात. ती जगल्यावर तो रोपा छाटून टाकितात. ती डाहाळी मोठी झाल्यावर त्याचें कलमी झाड होतें.
हर्ष (ना.)—आनंद.
विचारवंत (वि.)—विचार करणारा.
तरतूद (ना.)-तजविज.[झाला.
विरघळला (क्रि.)—पातळ
हिरमुसलें (वि.)—वाईट.
मत (ना.)—समज.
हावरेपणा (भा. ना.)—जें तें हवें असें म्हणणें.
अधाशीपणा (भा.ना.)—खादाडपणा.
पुरवतें (क्रि.)—पतकरतें.
आग (ना.)—काहिली.
निसटून (धा. अ.)—निघून, उठून.
आसवें(ना.)—आनंदानें किंवा दुःखानें येणारें डोळ्यांतील पाणी, अश्रु.
पाण्यानें भरून आले—अत्यानंद किंवा अति दुःख झालें म्हणजे मनुष्याचे डोळे पाण्यानें भरून येतात.

धडा ३२.

स्वरूप (ना.)—आकार.
गालफड (ना.)—गाल.
सर्वांग (ना.)—(सर्व+अंग)—सगळें अंग.
घ्राणेंद्रिय (ना.)—(घ्राण+इंद्रिय)—वास घेण्याचा अवयव—नाक.
सावली (ना.)—छाया.
फळणें (क्रि.)—गाभण राहाणें.
विणें (क्रि.)—प्रसूत होणें.

धडा ३३.

गृहस्थ (ना.)—गृह=घर+स्थ=राहाणारा.)—घरांत राहाणारा म्हणजे खाऊन पिऊन सुखी असा.
एकुलता (वि.)—एकटा.
विद्याहीन (क्रि. वि.)—विद्या नाहीं असें, अडाणी.
प्रीति. (ना.)—ममता.

दृढ (क्रि. वि.)—पक्कें. [मार्गे.
माघारा (क्रि. वि.)—पाठी-
दटावणें (धा.)—धमकी देणें.
मुद्रा (ना.)—चेहरा, चर्या.
सलाम (ना.)—रामराम.
वर्तमान (ना.)—हकीगत.
वारंवार (क्रि.वि.)—नेहमीं.
धर्म (ना.)—कर्तव्यकर्म.

घडा ३४.

महासागर(ना.)—मोठा समुद्र.
ढलपा (ना.)—लाकडाचें
 सालपट.
रानटी (क्रि. वि.)—जंगली,
 अडाणी स्थितींतले.
कारागिरी (ना.)—कसब.
मिशनरी (ना.)—ख्रिस्तीध-
 र्माचा उपदेश करणारे, पाद्री.
सुशिक्षित (वि.)—चांगले
 शिकलेले, विद्वान्.
इमारत (ना.)—घर, वाडा.
गुण्या (ना.)—┌या आकृ-
 तीचें सुताराचें लांकडी
 हत्यार. [मनुष्य.
वजा कोक (ना.)—वजनदार
देखरेख (ना.)—तपासणी.
अभिप्राय(ना.)-मतलब, उद्देश.
धिक्कार (ना.)—तुच्छ मानणें.
हुज्जत (ना.)—तकरार, वाद
 घालणें.
बोलके (ना.)—बोलणारे.

घडा ३५.

पात्र (ना.)—भांडें.
अडचण (ना.)—नड.
वृद्ध (ना.)—वाढणें.
द्वीपांतर (ना.)—(द्वीप=
 बेट+अंतर=दुसरें) दुसरें
 बेट. [बांधतात ती काठी.
डोलकाठी (ना.)—शीड जिला
वारा धरणें—वारा आंत घेणें.
शीड (ना.)—अवजार.
पडम (ना.)—खादी, जाड
 कापड.
सुकाणूं (ना.)—तारूं पाहिजे
 तिकडे फिरवण्याचें साधन.
नांगर (ना.)—तारूं चाला-
 वयाचें बंद होण्याकरितां
 लोखंडाचा जड तुकडा
 काथ्याच्या दोरीस किंवा
 सांखळीस बांधलेला अ-
 सतो तो; लोयकी.
अग्रभाग (ना.)—पुढीलभाग.
सोल (ना.)—बळकट दोर.

ओरवा (ना.)—मुकाम. [सणें.
तळीं रुतणें-तळास जाऊन ब-
खुंटून (धा. अ.)—थांबून.
हाकारणें (धा.)—चालू करणें.
वल्हें (ना.)—पाणी तोडून होडी चालविण्याकरितां लांकडाचा पसरट तुकडा असून त्यास पाठी दांडा असतो.
कलथा (ना.)—कोंखंडाचें शेवटाकडे चपटें केलेलें भांडें, उलथना.

धडा ३६.

नीतिपर कविता.

कवितेंतील शब्दार्थ.

नीतिपर (वि.)—नीति म्ह० सदाचरणाची वर्तणूक ठेवणें ; यावरून नीतिपर म्ह० ज्यांत नीति सांगि-तली आहे अशी.
दैव (ना.)—नशीब.
गर्व (ना.)—अभिमान.
भरवसा (ना.)—विश्वास.
शोक (ना.)—हळहळ.
वृथा (क्रि.वि.)—व्यर्थ,फुकट.
वित्त (ना.)—पैसा, द्रव्य.
शाश्वत (क्रि. वि.)—नेहमीं, सतत.
काय (ना.)—देह, शरीर.
क्षणिक (वि.)—थोडे दिवस टिकणारें.
जन (ना.)—लोक. [कल्याण.
आत्महित (ना.)—आपलें
हित (क्रि. वि.)—कल्याण करणारें.
सुत (ना.)—पुत्र.
दारा (ना.)—आपली बायको.
परि (अ.)—परंतु.
परिणामीं (ना.)—शेवटीं.
दुःखप्रद (वि.)—दुःख देणारें.
अहित (वि.)—हित न कर-णारें, दुष्ट.
स्वहितार्थ (ना.)—(स्व+हित +अर्थ=करितां)—आप-ल्या हिताकरितां.
सदुपदेश (ना.)—(सत्+उ-पदेश)—चांगला उपदेश.

निज (ना.)–आपलें.
अन्य दुःख (ना.)–(अन्य=दुसरा+दुःख)–दुसऱ्याचें दुःख.
तत्काळ (क्रि.वि.)–लागलेंच.
कळवळणें(क्रि.)–दया येऊन मनास वाईट वाटणें.
उघडा (वि.)–ज्यास वस्त्र नाहीं तो.
क्षुधित (वि.)–भुकेलेला.
अभय (ना.)–'भिऊं नको' असें सांगणें.
भीत (वि.)–भ्यालेला.
हात देणें–मदत देणें.
धीर (ना.)–धैर्य.
ताल (ना.)–सूर, ठेका.
गीत (ना.)–गाणें.

मूळ कविता.

आर्या.

दैवें द्रव्य मिळालें, जरि तरि चित्तीं धरूं नये गर्व ॥
त्याचा काय भरवसा जाइल[१] बापा क्षणांत तें सर्व ॥ १ ॥

अन्वयः–जरि दैवें द्रव्य मिळालें, तरि चित्तीं गर्व धरूं नये. बापा, त्याचा काय भरंवसा; तें सर्व क्षणांत जाईल.

अर्थः–जरि आपणास नशीबानें पैसा मिळाला तरी मनांत ताठा आणूं नये. अरे बा, तें द्रव्य आपणांजवळ राहील किंवा नाहीं हें कोणी सांगावें? कदाचित् तें सर्व द्रव्य एका क्षणांत नाहींसें होईल.

टीपः–१ 'जाइल' यांतील 'इ' दीर्घ पाहिजे परंतु कवितेचे गण समजण्याकरितां ऱ्हस्व लिहिली आहे.

गेल्याचा शोक वृथा, न करावा वित्त सर्व जायाचें ॥
वित्ताची काय कथा, शाश्वत टिकणें नसेच कायाचें ॥ २ ॥

अन्वयः–वित्त गेल्याचा शोक वृथा न करावा; सर्व जायाचें. कायाचें टिकणें शाश्वत नसेच; वित्ताची कथा काय?

अर्थः–आपलें द्रव्य नाहींसें झालें याबद्दल व्यर्थ दुःख करीत बसणें बरोबर नाहीं. कारण याप्रमाणेंच सर्व वस्तु नाहींशा व्हावयाच्या आहेत. अरे मनुष्या, हा जो आपला देह तो देखील नेहमीं रहावयाचा नाही (कधींना कधीं तरी नाहींसा होईलच म्हणजे मनुष्य मरेल), तर मग द्रव्य नाहींसें होईल यांत मोठेंसें नवल नाहीं.

टीपः–१ 'व्यर्थ' म्हणण्याचें कारण दुःख केल्यानें तें द्रव्य कधीं परत मिळतें काय? तर मग दुःख करून आपल्या जिवास नसता त्रास करून घेण्यांत वेडेपणा नाहीं काय?

देह क्षणिक गणावा, ईश्वर भजनांत काळ हा जावा ॥
बाळपणापासुनि जन, साधाया आत्महित न लाजावा ॥ ३ ॥

अन्वयः–देह क्षणिक गणावा, हा काळ ईश्वरभजनांत जावा. जन बाळपणापासुनि आत्महित साधायों न लाजावा.

अर्थः–हा आपला देह कोणत्या क्षणांत (केव्हां) नाहींसा होईल याचा नियम नाहीं असें समजून चाललें पाहिजे. म्हणून आपला सर्व वेळ परमेश्वराचे चिंतनांत घालवावा हें योग्य. लोकांनीं ल्हानपणापासून परमेश्वराचे भजनाच्या योगानें आपलें कल्याण साधून घेण्यास कधीं मागें पुढें पाहूं नये.

टीपः–१ साधया=साधायाला (चतुर्थी विभक्ती).

हित भजन ईश्वराचें, धनसुतदारादि दिसति मात्र हित ॥
परि परिणामीं दुःखप्रद मग त्यां कां म्हणूं नये अहित ॥ ४ ॥

अन्वयः–ईश्वराचें भजन हित, धनसुतदारादि हित मात्र दिसति; परि परिणामीं दुःखप्रद, मग त्यां अहित कां म्हणूं नये?

अर्थः–परमेश्वराचें भजन करणें यांतच काय तें आपलें खरें कल्याण आहे; पैसा, पुत्र, बायको इत्यादि आपलें हित करणारीं आहेत असें आपणांस प्रथम दिसतें खरें, परंतु शेवटीं

तीं दुःख देणारीं आहेत. असें जर आहे, तर मग आपण त्यांस आपले 'शत्रु' असें कां म्हणूं नये? अर्थात् म्हणावें.

टीपाः-१ पैसा प्रथम हितकारक दिसतो खरा, परंतु त्याच्या पासून केवढे अनर्थ घडतात तिकडे लक्ष दिलें म्हणजे खात्री होईल. पैशानें मित्र जोडतात व मित्र असतील ते शत्रु होतात. वाईट कामाकडे मनाची प्रवृत्ति होते व आंगचा नम्रपणा जातो इ० २ पुत्र व बायको हीं, आपला चालता काळ आहे तोंपर्यंत आपणांस विचारतात, नाहीं तर आपले हाल अतिशय करतात. आपण मेल्यावर आपले बरोबर कोणीही येत नाहीं. फक्त आपलें पुण्य बरोबर येतें, व हें पुण्य परमेश्वराची भक्ति केल्याशिवाय प्राप्त होत नाहीं. तेव्हां स्त्री व पुत्र हीं दुःखप्रद खरींच आहेत. ३ 'शत्रु' म्हणण्याचें कारण आपले शत्रु आपलें हित कधीं तरी करतील काय? तेव्हां हीं जर आपलें हित करणारीं नाहींत तर त्यांस 'शत्रु' म्हणणेंच बरोबर आहे.

स्वहितार्थ सदुपदेशा, सांगे जो त्यांकडे मन वळावें ॥
निजचित्त अन्यदुःखा, पाहुन तत्काळ वा कळवळावें ॥ ९ ॥

अन्वयः--जो स्वहितार्थ सदुपदेशा सांगे, त्याकडे मन वळावें. वा अन्यदुःखा पाहुन निजचित्त तत्काळ कळवळावें.

अर्थः--जो मनुष्य आपल्या कल्याणासाठीं आपणाला चांगल्या उपदेशाच्या गोष्टी सांगेल त्याच्या त्या गोष्टी लक्षपूर्वक ऐकून घ्याव्या. अरे, दुसऱ्याची वाईट स्थिति पाहून आपल्या मनाला लागलेंच त्याच्याविषयीं वाईट वाटावें.

टीपाः--अन्यदुःखा=दुसऱ्याचे दुःखाला (द्वितीया विभक्ति). २ दुसऱ्याचें दुःख पाहून मनास वाईट वाटणें ही खरोखर एकाद्याच्या उदार मनाची गोष्ट आहे, व त्याचे अंगीं वास्तविक भूतदया आहे, असें त्यावरून वाटतें. नुसतें वाईट वाटून कांहीं उपयोग नाहीं. आपले हातून होण्यासारखें असल्यास त्याचें दुःख कमी करण्यासाठीं प्रयत्न करावा हीच मोठेपणाची गोष्ट होय.

उघड्यास वस्त्र द्यावें, क्षुधिताला अन्न अभय भीताला ॥
बुडत्यास हात द्यावा, घाबरल्या धीर ताल गीताला ॥ ६ ॥

अन्वयः–उघड्यास वस्त्र, क्षुधिताला अन्न, भीताला अभय द्यावें. बुडत्यास हात, घाबरल्या धीर, गीताला ताल द्यावा.

अर्थः–ज्या मनुष्यास नेसण्यास किंवा पांघरण्यास कांहींएक नसेल त्यास कांहीं चिरगुट द्यावें; ज्याचे पंचप्राण भुकेनें व्याकुळ होताहेत त्यास अन्न द्यावें; जो मनुष्य भीतीनें गडबडून गेला असेल त्यास 'भिऊं नको' 'तुझें रक्षण करीन' म्हणून वचन द्यावें; जो पाण्यांत बुडत असेल त्यास हात द्यावा व वर काढावें; जो घाबरला असेल त्यास 'भिऊं नको' म्हणून सांगावें, व गाण्याला सूर द्यावा. सारांश, जो मनुष्य संकटांत असेल त्यास मदत करावी.

टीपाः–१ वरील सर्व उदाहरणें 'योग्य धर्मकृत्य' कशास म्हणावें? याबद्दल आहेत. ज्याला खाण्याला कांहीं नाहीं त्यास अन्न दिलें असतां त्याचा आत्मा संतुष्ट होऊन तो आपणास दुवा देईल. याप्रमाणेंच आपणास जो दानधर्म करावयाचा तो फक्त अनाथ, संकटांत पडलेले अशा लोकांस–सारांश सत्पात्रीं करावा. उदाहरणार्थ, याच पुस्तकांतील धडा ५८, 'सर जमशेटजी जिजीभाई बारोनेट' यांचें वर्णन पहा. त्यांनीं जीं धर्मकृत्यें केलीं आहेत तीं खरोखर उत्तम आहेत. २ 'बुडत्यास हात द्यावा' याचे अर्थ दोन होऊं शकतील. एक बुडता याचा अर्थ पाण्यांत बुडणारा व दुसरा लाक्षणिक अर्थ ज्याचा सर्वांशीं नाश होत आहे असा; व त्याला हात देणें म्हणजे त्याला 'मदत करून त्यास संकटांतून पार पाडणें.' आपल्या घरीं चोरी झाली म्हणजे सर्वस्वी बुडालों रे बुडालों असें म्हणण्याची साधारण चाल आहे. ३ कदाचित् कोणी म्हणेल गाण्याला पाठीमागून सूर दिला म्हणजे तें सत्पात्रीं दान कसें होतें? तर पहा. सूर दिला म्हणजे गाण्यास उत्तेजन येतें व गाण्यास अधिक मधुरता येते. हें तरी एक प्रकारचें सहाय्यच होय.

धडा ३७.

तुळ्या (ना.)—वहालें.
आरंभ (ना.)—सुरवात.
पाया (ना.)—इमारत मजबूत राहण्याकरितां जमिनींत खणून आंतून भिंत बांधीत आणिलेली असते तीस पाया ह्मणतात.
उभारणें (धा.)-रचणें, बांधणें.
गिलावा (ना.)—भिंत गुळगुळीत होण्याकरितां ती मातीनें किंवा चुन्यानें चोपडणें.
मजला (ना.)—माडी.
जोतें (ना.)—चौथरा.
जिना (ना.) उंचीवर चढण्याकरितां पायऱ्यांची केलेली वाट.
मुरूम (ना.)-दगडाळ माती.
कड्या(ना.)—लांकडाचे वांसे.
तक्तपोशी (ना.)—कडीपाट.
पेंड (ना.)—थर.
खपरेल (ना.)—छपर.
ओंबण (ना.)—वांशांवर कौलें राहण्याकरितां लांकडाच्या बारीक बारीक पट्ट्या घालितात त्या.
फांका (ना.)—तुकडे.
खटपट (ना.) मेहनत.

धडा ३८.

आच्छादन (ना.)—झांकण.
चाल (ना.)—रीत, परिपाठ.
फ्रेंच (ना.)—फ्रान्स देशांतील लोक.
पोर्तुगीज (ना.)—पोर्तुगाल देशांतील लोक.
पटका (ना.)—रुमाल.
पदर (ना.)—शेवटास कलाबूत भरलेला असतो तो.
कलाबतू (ना.)—जर.
गोळ (ना.)—साधी जरीची पट्टी जशी चंदेरी पागोट्यास असते तशी.
नामांकित (वि.) प्रसिद्ध, आब्रूची.
उत्तमपक्ष (ना.)—उत्तममार्ग.
भाग पडतें—अगत्य किंवा जरूर पडतें.
सन्मान (ना.)—(सत्+मान) —आदरसत्कार, मान.

धडा ३९.

रुचि (ना.)—चव.
फड (ना.) ऊंसाचें शेत.

पाचोळा (ना.)–उंसाच्या वाळलेल्या पाल्या.
वाडें (ना.)–उंसाच्या शेंड्या-कडचा भाग.
चरक (ना.)–घाणा, रगाडा.
काहिल (ना.)–गूळ कढवि-ण्याचें भांडें.
चुलाण (ना.)–मोठी चूल.
उकळविणें (क्रि.) कढविणें.
बेहडा (ना.)–एक झाड व त्याचें फळ. [रस.
पाक(ना.)कढवून दाट केलला
शिरें (ना.)–एके प्रकारचा झारा.
रवाळ (वि.)–कणदार.
कोरडा (वि.)–सुका.
कोथळी (ना.)–पोतें.

धडा ४०.

स्वतंत्रपणा (भा. ना.)–दुस-ऱ्याच्या ताब्यांत नसणें.
हौशी (वि.)–चैनी.
नर (ना.) पुरुषजात.
मादी (ना.)–स्त्रीजात.
बिनचूक(क्रि.वि.)–न चुकतां.
कळप (ना.)–जमाव, टोळी.
मिसळले (क्रि.)-एकत्र झाले.
वेगळे (क्रि. वि.)–निराळे.
वीण (ना.)–वाढत होण्याची खेप.
दूस (ना.)–शेंपूट, पिसारा.
झोंक (ना.)–ठेवण, कल.
गिरेबाज (वि. ना.)–गिर-क्या मारणारा.
गिरक्या (ना.)–फेऱ्या.
भेकड (वि.)–भित्री.
सहवास (ना.)–संगति, जवळ असणें.
खबरदार (ना.)–सोंक, भेग.
स्वच्छंदानें (ना.)–(स्व+छंद)=आपल्याच नादानें, स्वतंत्रपणानें.

धडा ४१.

स्लेट (ना.)–दगडी पाटी.
सोय (ना.)–तजवीज.
परिपाठ (ना.)–रिवाज,चाल, रीत.
पाट्यांचे जागीं–पाट्यांचेबदल.
साफ (वि.)–गुळगुळीत.
कोरीची कोरी (वि.)-स्वच्छची स्वच्छ.
पदर (ना.)–सांधे.
रंधा (ना.)–कांकूड गुळ-

गुळीत करण्याचें सुताराचें हत्यार.

खाण (ना.)—जमिनीच्या पोटांत पुष्कळ धातु व दगड आहेत, ते बाहेर काढण्याकरितां जो खळगा खणावा लागतो त्यास खाण ह्मणतात.

ठिसूळ (वि.)—लवकर फुटणारें.

रांधणें. (क्रि.)—शिजविणें.

चरक (ना.)—सुर्‍या, चाकू इत्यादि साफ करण्याचें यंत्र.

सफाईदार (वि.)-साफ केलेली, चकचकीत.

धडा ४२.

रोंख (ना.)—झोंक, कल.

झिंज्या (ना.)—केंस सोडले असतां अव्यवस्थितपणें लोंबत असतात त्यास ह्मणतात.

विरक्त (वि.)—सर्व वस्तूंचा त्याग केल्यासारखा, उदास.

धडक (ना.)—टक्कर.

सांगड (ना.)—एके ठिकाणी.

संकेत (ना.)—मनांत योजिलेलें कार्य.

कटाक्ष (वि.)—श्रमाची वगैरे परवा न बाळगणारें.

पाणथळ (वि.)—चिखलट.

माजलेलें (धा.)—उंच व अस्ताव्यस्त वाढलेलें.

माणसाळणें (क्रि.)-मनुष्याचा पूर्ण सहवास होणें.

चैन पडत नाहीं-करमत नाहीं.

कुशळ (वि.)—चतुर, शहाणी.

गुणावह (वि.)—गुण आणणारें.

ओसाड (वि.)—लागवड न केलेली.

चरबी (ना.)—शरिरांतील तेलकट पदार्थ.

खुलतो (क्रि.)—शोभतो, वठतो.

धडा ४३.

नीतिपर कविता.

कवितेंतील शब्दार्थ.

देशाटन (ना.)—[देश+अट-
न=हिंडणें] देश फिरणें.
पंडितमैत्री (ना.)—विद्वानांचा
सभा (ना.)—मंडळी. [स्नेह.
संचार (ना.) प्रवेश.
ग्रंथ (ना.)—पोथी, पुस्तक.
विलोकन (ना.)—पहाणें.
मनुज (ना.)—मनुष्य.
चातुर्य (ना.)—शहाणपण.
श्रेष्ठ (वि.)—मोठे, विद्वान्.
नम्रपणा (भा.ना.)—अदबी.
सेवीं (क्रि.)—चाकरी कर.
दुर्बळ (वि.)—गरीब.
आदरें (ना.)—सत्कारानें.
दावी (क्रि.)—दाखवील.

आदरावी (क्रि.) धरावी.
संपत्तिगर्वराशी—द्रव्य मिळा-
ल्यामुळें फार गर्विष्ठ.
पद (ना.)—योग्यता.
क्षमा (ना.)—सहनशीलता. [ल.
विपत्ती (ना.)-गरिबी, संकटका-
संपदा (ना.)—संपत्ति. [लेली.
रुष्ट (वि.)—नाखुष, रागाव-
सोयरे (ना.)—नातलग.
क्लेश (ना.)—दुःख.
वृष्टि (ना.)—पाऊस.
स्वयें (क्रि.वि.)-स्वतः [राहिलेले.
आश्रित (ना.)—आसरा धरून
मानस (ना.)—अंतःकरण.
झरा (ना.)—पाझर.

मूळ कविता.

आर्या.

केल्यानें देशाटन, पंडितमैत्री सभेंत संचार ॥
शास्त्र-ग्रंथविलोकन, [१] मनुजा चातुर्य येतसे फार ॥ १ ॥

अन्वयः—देशाटन, पंडितमैत्री, सभेंत संचार, शास्त्र-ग्रंथविलोकन, केल्यानें मनुजा फार चातुर्य येतसे.

अर्थः—पुष्कळ देश हिंडल्यानें [२], विद्वान् लोकांची ओळख करून त्यांच्याशीं मैत्री जोडल्यानें, कोठें सभा अस-

त्यास तेथें गेल्यानें तसेंच शास्त्रसंबंधी विषयांवर लिहिलेलीं पुस्तकें वाचल्यानें मनुष्याला फार शहाणपण येतें.

टीपाः---१शास्त्रग्रंथविलोकन=(शास्त्र=ग्रंथ=विलोकन) शास्त्रसंबधी जे ग्रंथ ते शास्त्रग्रंथ, शास्त्रग्रंथांचे विलोकन म्हणजे पहाणें तें शास्त्रग्रंथविलोकन, येथें शास्त्र या शब्दाचे दोन अर्थ होऊं शकतील. एक धर्मसंबधीं विषयांवर जें लिहिलेलें असतें तें, व दुसरें यंत्रसंबंधीं, ज्योतिषसंबंधीं, रसायनसंबंधीं वगैरे जें लिहिलेलें असतें त्यासही यंत्रशास्त्र, ज्योतिषशास्त्र, रसायनशास्त्र असें म्हटलें आहे. वास्तविक पाहतां हीं दुसऱ्या प्रकारचींच शास्त्रें मनुष्यास व्यवहारामधील शहाणपण शिकवितात. २ देश हिंडल्यानें ठिकठिकाणच्या रीतिभाती कळतात. कोठें काय चमत्कार आहेत वगैरे सर्व कळतें व तेणेंकरून मनुष्यास शहाणपण फार येतें. ३ सभेंत गेल्यानें कोणत्याही विषयावर बोलण्याची संवय लागते व अशा प्रकारें नाना प्रकारच्या विषयांवर बोलतां येऊं लागलें म्हणजे आपोआपच अंगीं शहाणपण येतें.

दिंडी.

श्रेष्ठ लोकांतें नम्रपणें सेवीं । दुर्बळांवरि आदरें प्रेम ठेवीं ॥
जरी कोणी तूजला क्रोध दावी । जपुन तेथें त्वां शांति आदरावी ॥ २ ॥

अन्वयः--श्रेष्ठ लोकांतें नम्रपणें सेवीं, दुर्बळांवरि आदरें प्रेम ठेवीं, जरी कोणी तूजला क्रोध दावी, तेथें त्वां जपुन शांति आदरावी.

अर्थः--जे कोणी आपल्याहून विद्येनें, पैशानें, वयानें अगर मानानें मोठे असतील त्यांच्याशीं फार अदबीनें वाग, व जे गरीब दुबळे, ज्यांचें कोणी रक्षण करणारा नाहीं असे असतील त्यांचा सत्कार करून त्यांच्यावर प्रीति करीत जा. जरी कोणी तुझ्यावर रागावलें तरी त्या रागाबद्दल उलट रागानें उत्तर न करितां विचारानें वागून मुकाट्यानें बसावें.

टीपाः-१ 'दुर्बळ' ह्याचा अर्थ मुके, आंधळे, पांगळे, थोटे,

सारांश संकटांत पडलेले व ज्यांचें कोणीही रक्षण करणारें नाहीं असे लोक. याच अर्थाचा श्लोक मराठी पहिल्या पुस्तकांत गेला आहे, 'मुके आंधळे पांगळे आणि थोटे ॥ अशा दुर्बळांला करा साह्य मोठें ॥' खऱ्या धर्माचें लक्षण हेंच आहे.

दयाळू हो सर्वदा सेवकांशी । नको होऊं संपत्तिगर्वराशी ॥
जरी चढलासी थोरल्या पदाशी । नको दुखवूं बोलून तूं जनांशी॥३॥

अन्वयः–सर्वदा सेवकांशी दयाळू हो; संपत्तिगर्व-राशी होऊं नको. जरी थोरल्या पदाशी चढलासी: (तरी) तूं जनांशी बोलून दुखवूं नको.

अर्थः–नेहमीं आपल्या चाकरांना ममतेनें वागवीत जा; व जवळ पैसा आहे ह्मणून त्याचा अभिमान बाळगून उन्मत्त होऊं नको. जरी मोठ्या पदवीस चढलास तरी लोकांना शिवीगाळ करून त्यांचीं मनें दुखवूं नको.

टीपः-१ संपत्तिगर्वराशी ६०-व्या कवितेंत सांगितलेला बोध प्रत्येकानें आपल्या नीट ध्यानांत ठेवावा. कारण आपण नेहमीं असें पाहतों कीं, ज्यांना पैसा बराच मिळूं लागतो त्यांना लागलेंच ऐश्वर्याचें वारें लागून ते कोणासही जुमानीत नाहींत. त्यांना धन-हीन लोक तुच्छ वाटतात. अंगांत ताठा येतो. व नेहमीं श्रीमं-तीपासून मिळणाऱ्या सुखोपभोगांत व चैनबाजींत ते निमग्न अस-तात. थोडासा अंमल हातांत आला पुरे, कीं लागलीच तो अंमल दुसऱ्यावर बजावण्यास व लोकांवर तोंड टाकण्यास ते मागें पुढें कधींही पहात नाहींत.

आर्या.

चित्तीं क्षमा असावी, जेव्हां येते घरास संपत्ती ॥
धैर्य धरावें आली, दैवानें आपणा जरि विपत्ती ॥ ४ ॥

अन्वयः–जेव्हां घरास संपत्ती येते (तेव्हां) चित्तीं क्षमा असावी. जरी दैवानें आपणा विपत्ती आली (तरी) धैर्य धरावें.

अर्थः—आपले घरांत संपत्ती आली ह्मणजे मनांत नेहमीं सहनशीलता असूं द्यावी, ह्मणजे दुसऱ्याकडून कांहीं अपराध घडला असला तर त्यास क्षमा करण्याविषयीं फार तत्पर असावें. दुर्दैवेंकरून जरी आपणास गरिबी आली तरी आपला धीर खचूं देऊं नये.

टीपः—मनुष्य गरीब स्थितींत असला म्हणजे बहुतकरून त्याचा स्वभाव असा असतो कीं, लोकांकडून कांहीं अपराध घडला असल्यास, त्या अपराधाबद्दल सूड घेण्यास उतावीळ न होतां सहजच तो त्यास क्षमा करतो. परंतु तीच त्याची गरिबी जाऊन त्यास श्रीमंती प्राप्त झाली ह्मणजे सहसा त्याच्या अंगीं हा गुण वसत नसतो.

संपदा बहु, आलियावरी ॥ सोयरे जमा होति त्या घरीं ॥
गेलियास ती रुष्ट होउनी ॥ बंधुसोयरे जाति सोडुनी ॥ ५ ॥

अन्वयः—बहू संपदा आलियावरी त्या घरीं सोयरे जमा होती; त्या रुष्ट होउनी गेलियास, बधुंसोयरे सोडुनी जाति.

अर्थः—आपला चालता काळ असल्यास ह्मणजे आपल्या घरीं पुष्कळ संपत्ती असल्यास सुखाचे वांटेकरी होण्यास व मदत करण्यास पुष्कळ नातेवाईक जमतात, परंतु तीच लक्ष्मी आपल्यावर एकदा नाखुष होऊन आपणास सोडून गेली म्हणजे लगेच बंधु, नातेवाईक वगैरे सर्व आपणांस सोडून जातात.

रक्षितो जना क्लेश भोगुनी ॥ सुख नसे कधीं राजया मनीं ॥
वृष्टि उष्णही वृक्ष सोशिती ॥ राखिती स्वयें आश्रितांप्रती ॥ ६ ॥

अन्वयः—क्लेश भोगुनी जना रक्षितो, राजया मनीं कधीं सुख नसे. वृक्ष वृष्टी उष्णही सोशिती, स्वयें आश्रितांप्रती राखिती.

अर्थः—राजा आपण स्वतः दुःख भोगून आपल्या प्रजेचें रक्षण करितो, त्याचे मनाला कधींही सुख वाटत नाहीं.

उदाहरणार्थ, झाडें हीं पाऊस व ऊन सोशितात परंतु स्वतः त्यांचा आश्रय करून राहणारांचें पाऊस व ऊन यांपासून संरक्षण करितात.

टीपः–१ राजा दुःखें भोगून आपल्या प्रजेचें रक्षण करितो याचें वाचल्याबरोबर कदाचित् आश्चर्य वाटेल. परंतु पाहिलें असतां खरोखर तशीच स्थिती असते. राजाला प्रजेच्या कल्याणाकरितां देशांत शांतता राखावी लागते. परचक्र आलें असतां त्याचें निवारण करून प्रजेच्या सुखाकरितां स्वतःच्या तोंश्यानें चांगले चांगले कायदे करावे लागतात. अन्याय घडला असतां सर्व लोकांचे शाप त्याला बसतात, इत्यादि नानाप्रकारचीं दुःखें भोगावीं लागतात. २ राजाला झाडाची उपमा आहे. ती अशी कीं, ज्याप्रमाणें झाडें स्वतः पाऊस, ऊन यांजपासून कष्ट सोसून, त्यांच्या सावलीखालीं बसणारांचें संरक्षण करितात, त्याप्रमाणें राजा स्वतः कष्ट सोसून प्रजेचें संरक्षण करितो, ऊन कडक पडलें असतां एकाद्या झाडाच्या सावलीखालीं बसलें म्हणजे आपल्या मनास किती शांति वाटते बरें! परंतु वास्तविक पाहतां झाडांचीं पानें कडक ऊन अनुभवितात.

मानसीं सदा प्रीतिचा झरा ॥ वाहता असो हें मनीं धरा ॥
प्रीतिपासुनि प्रीति वाढती ॥ रुष्ट बाळकें दुःख पावती ॥ ७ ॥

अन्वयः–सदा मानसीं प्रीतिचा झरा वाहता असो हें मनीं धरा. प्रीतिपासुनि प्रीति वाढती. रुष्ट बाळकें दुःख पावती.

अर्थः–पाण्याच्या झऱ्याप्रमाणें नेहमीं आपल्या मनांत प्रीतीचा झरा वाहत जावो म्हणजे दुसऱ्यावर प्रीति करण्याची अंतःकरणांत बुद्धि उपजो अशी तुम्हीं मनांत इच्छा धरा. आपण जर लोकांवर प्रीति केली तरच लोक आपणांवर प्रीति करितात असा नियम आहे, व यामुळेंच प्रीतिपासून प्रीति वाढत जाते. जीं मुलें नेहमीं असंतुष्ट असतात त्यांच्या मनास दुःख होतें.

धडा ४४.

निर्दय (वि.)—ज्याला दया नाहीं असा; क्रूर.

शेवटास नेणें—तडीस लावणें, संपवणें.

खोल बुद्धि—पूर्ण विचाराची [बुद्धि.

ओंजळ (ना.)—पसा.

कुपी (ना.)—बाटली, शिशी.

गुळणा(ना.)—पाण्याची चूळ.

उलटून बोलूं नको—उलट जबाब देऊं नको.

शांत होईल—नाहींसा होईल.

धडा ४५.

वारूळ (ना.)—मुंग्याचें घर.

संग्रह (ना.)—सांठा.

पट्टी (ना.)—लहानशी रांग.

नित्य (क्रि. वि.)—नेहमीं.

श्रमांत कष्टत असतात—मेहनत करून आपल्यास त्रास देतात.

सुखरूप (क्रि. वि.)—खुशाल.

कष्टाळू (वि.)—मेहनत करणारा.

धडा ४६.

समज(ना.)—समजूत.

अनुभव (ना.)—प्रचीति.

दोष (ना.)—अपराध.

बाडगें (ना.)—पसूं.

गंज (ना.)—गवताची रास.

फाटक (ना.)—दार.

शिंगरूं (ना.)—घोडीचें पोर.

भान (ना.)—स्मरण, आठवण.

धास्ती (ना.)-काळजी, चिंता.

कोपरा (ना.)—कोन.

निवाडा (ना.)—न्याय, निकाल.

पारिपत्य (ना.)—शासन, [शिक्षा.

शाबासकी (ना.)—उत्तेजन, चांगलें काम केलें असें म्हणणें.

धडा ४७.

तऱ्हा (ना.)—प्रकार.

शुभ्र (वि.)—पांढरा.

साधीं (वि.)—हलकीं, थोड्या किंमतीचीं.

गंगाजमनी (वि.)—ज्यांच्या कांठाच्या दोन बाजू दोन रंगाच्या असतात तीं.

प्रमाण (ना.)—मान.

कारागिर (ना.)—कसबी लोक. [घेणारे.

गिऱ्हाईक (ना.)—विकत

लगत (श. अ.)—लागून.
सोईचे (वि.)—उपयोगाचे, माफक.

धडा ४८.

धनवान् (वि.)—श्रीमंत, पैकेवाला.
दीनवाणे (वि.)—बापुडवाणे.
बदली (ना.)—अदलाबदल.
पांगळा (वि.)—ज्याच्या पायास चाकण्याची शक्ति नाहीं तो. [ण्याची काठी.
कुबडी (ना.)—काखेंत धर-
मीठभाकर (ना.)—जाडें-भरडें अन्न.

धडा ४९.

पाणपोई (ना.)—सर्वांस पाणी पिण्यास मिळण्याकरितां धर्मार्थ बांधिलेल्या विहिरी, तळीं इ०.
भोई (ना.)—मेणे, पालख्या इत्यादि वाहणारे.
कळक (ना.)—वेळू.
नळकंडें (ना.)—वेळू पेराचे खालीं कापून वरील तोंड उघडें ठेविलें म्हणजे तें नळकंडें होतें.
रांजण (ना.)—पाण्याचें मोठें मडकें.
काबाडकष्ट (ना.)—जिवाप-
ऐन (वि.)—भर. [कीकडे श्रम.
तळमळत(क्रि.वि.)—भाजत.
घसा (ना.)—गळा.
विपत्ति (ना.)—दुःख.
धापा टाकणें—दम टाकणें.
हुशारी यावी—जीव सावध व्हावा.
चिंतितात (क्रि.)—इच्छितात.
क्षुल्लक (वि.)—हलकें.
बनमान(ना.)—काकूं करणें.
कोटिशः(वि.)—कोट्यावधि.
स्वार्थ (ना.)—(स्व+अर्थ) आपलें हित.
परमार्थ (ना.)—(परम+अर्थ) मोठें हित ह्म० स्वर्ग प्राप्ति.
समाधान (ना.)—संतोष.

धडा ५०.

आंगलट (ना.)—शरिराचा बांधा.
कुरळ(वि.)-वळकट्या झालेले
पाळींव (वि.)—बाळगलेलीं.
बिनदिक्कत (क्रि. वि.)—निःसंशय.

सावध (वि.)—हुशार.
परिचित (वि.)—ओळख झालेला, परिचयाचा.
स्वभावतः (क्रि. वि.)— जन्मापासून.
जबर (वि.)—अतिशय.
खादाड(वि.)-पुष्कळ खाणारी
झोंप हलकी आहे—अंमळ कोठें हूं कां चूं झालें कीं लगेच तो जागा होतो.
खुट्ट झालें—वाजलें.[वळकटी.
वेटाळें (ना.)—आंगाची
जराग्रस्त (वि.)—म्हातारप-पणांतील सर्व रोग त्याचे मागें लागतात व त्यामुळें त्यास फार त्रास होतो.
प्राचीन (वि.)—फार पूर्वींचा.
पाणबुडे (ना.)—पाण्यांत बुडी मारणारे.[कावून राखीत बसणें.
खडा पहारा—एकसारखी नजर

घडा ५१.

प्राप्ति (ना.)—मिळकत.
प्रयोजन(ना.)—जेवण, भोजन.
अनुकूळ(वि.)—मिळण्याजोगें.
खचळणें—मोठमोठ्या लाटा उचंबळणें.

खोळंबा (ना.)—खोटी.
धीवर (ना.)—मासे धरणारा कोळी. [समारंभ.
मेजवानी (ना.)—जेवणाचा
पदर (ना.)-चाबकाची वादी.
हेका (ना.)—हट्ट, दुराग्रह.
तऱ्हेवाईक (वि.)—विलक्षण, चमत्कारिक.
वेडे पीर—वेडे मनुष्य.
नलगे (क्रि.)—नको.
देवडी (ना.)—दरवाज्या-पुढील शिपाई लोकांची बसण्याची जागा.
तंतोतंत (क्रि.वि.)—अगदीं बरोबर, टापासटीप.
बरतरफ करणें—कामावरून काढून टाकणें.

घडा ५२.

सिद्ध (वि.)—निष्पन्न.
उल्हासवृत्ति (वि.)—आनं-दित स्वभावाचे.
आवश्यक(क्रि.वि.)—जरूर.
भलेपणा(भा.ना.)—सचोटी.
इमान (ना.)—प्रामाणिकपणा.
पुरतेपणें (क्रि. वि.)—पूर्णपणें.
संधि (ना.)—वेळ.

धडा ६३.

उपदेशपर कविता.

कवितेंतील शब्दार्थ.

परांहीं (ना.)–दुसऱ्यांनीं.
अपकार (ना.)–पीडा.
कार्य (ना.)–काम.
तत्काल (क्रि. वि.)–लागलेंच.
कोमल (वि.) कोंवळें.
तरुतुल्य (ना.)–[तरु+तुल्य =सारखें.] झाडासारखी.
वेष्टुनी (धा. अ.)–गुंडाळून.
फांकेल (क्रि.)–पसरेल.
विद्यालय (ना.)–[विद्या+ आलय=जागा] शाळा.
खोल (ना.) दोष.
स्वल्प (क्रि. वि.)–थोडी.
वदावी (क्रि.)–बोलावी.

मूळ कविता.

आर्या.

उत्तम पुरुष म्हणावा, जो करितो शत्रुवरिहि उपकार ॥
बहु पीडितां परांहीं, स्मरत नसे जो मनांत अपकार ॥ १ ॥

अन्वयः–जो शत्रुवरिहि उपकार करितो, परांहीं बहु पीडितां मनांत अपकार स्मरत नसे, (तो) उत्तम पुरुष म्हणावा.

अर्थः–जो आपल्या शत्रूवर देखील उपकार करितो, आणि दुसऱ्यांनीं कितीही पीडा दिली तथापि त्यांना उलट पीडा द्यावी असें ज्याच्या मनांत मुळींच येत नाहीं, त्याला उत्तम पुरुष असें म्हणावें.

हें कार्य करीन तुझें, ऐसें बोलोनि कार्य तत्काल ॥
करणें योग्य असे वा, सुजनाची हीच कीं बरी चाल ॥ २ ॥

अन्वयः–हें तुझें कार्य करीन, ऐसें बोलोनि तत्काल कार्य करणें, कीं वा, सुजनाची हीच योग्य बरी चाल असे.

अर्थः–मी हें तुझें काम करीन, असें बोलल्यावर लाग-

लेंच तें काम करावें, कारण मुला, हीच शहाण्यांची योग्य आणि चांगली चाल आहे.

बाळपणीं बाळांची, कोमल-तरु-तुल्य बुद्धि वांकेल ॥
घेईल ज्या गुणाला, तो गुण मति वेष्टुनीहि फांकेल ॥ ३ ॥

अन्वयः—बाळपणीं बाळांची बुद्धि कोमल-तरु-तुल्य वांकेल. मति ज्या गुणाला घेईल तो गुण वेष्टुनीहि फांकेल.

अर्थः—लहानपणीं मुलांची बुद्धि कोंवळ्या झाडासारखी लवते. त्या वेळीं त्यांची बुद्धि ज्या गुणाला घेईल, तो गुण घेऊनही ती अधिक पसरेल.

विद्यालयीं मुलानें, जाण्याचा नित्य वेळ साधावा ॥
मानें नित्य वागावें, कीं गुरुचा बोल मज न लागावा ॥ ४ ॥

अन्वयः—मुलानें विद्यालयीं जाण्याचा वेळ नित्य साधावा. मानें नित्य वागावें, कीं, मज गुरुचा बोल न लागावा.

अर्थः—मुलानें शाळेंत जाण्याचा वेळ नेहेमीं साधावा. आणि मला गुरूचा दोष कधींही लागूं नये, असें निरंतर मनांत ठेवीत जावें.

अभ्यासाची वेळा, खेळांत स्वल्पही न दवडावी ॥
गेली वेळा येईल, पुनः अशी गोष्ट कांहिंहि न वदावी ॥ ५ ॥

अन्वयः—अभ्यासाची वेळा खेळांत स्वल्पही न दवडावी. गेली वेळा पुनः येईल अशी गोष्ट कांहिंहि न वदावी.

अर्थः—अभ्यास करण्याची वेळ थोडी देखील खेळण्यांत घालवूं नये. कारण खेळांत गेलेली वेळ पुन्हा येईल अशी गोष्ट कधींही बोलूं नये, (कधींही व्हावयाची नाहीं).

शाळेंत सोबत्यांनीं, खेळायाचा विचार जरि केला ॥
खेळूं नये आपण कीं, व्यर्थचि खेळांत काळ जो गेला ॥ ६ ॥

अन्वयः—शाळेंत जरि सोबत्यांनीं खेळायाचा विचार

केला, (तरी) आपण खेळुं नये, कीं जो काळ खेळांत गेला तो व्यर्थचि.

अर्थः—शाळेंत जरी आपल्या सोबत्यांनीं खेळायाचा बेत केला, तरी आपण खेळूं नये. कारण, जो वेळ खेळण्यांत गेला तो फुकट गेला.

धडा ५४.

ग्रासोडी(ना)-पांघरण्याचें जाड साळी (ना.)–कोष्टी. [वस्त्र.
संशय (ना.)–अंदेशा.
उन्मत्त (वि.)–उद्धट.
व्यय (ना.)–खर्च.
सद्व्यय (ना.)-(सत्+व्यय.) चांगला खर्च.
दूर होते–नाहींशी होते.

धडा ५५.

अदलाबदल (ना.)–एक वस्तु देऊन तिजबद्दल दुसरी घेणें, मोबदला.
रुमणें (ना.)–नांगराच्या दांड्याची मूठ. [खुद्द.
जातीनें (क्रि. वि.)–स्वतः,
वांकस (ना.)–तासणी.
किकरें (ना.)–कांकूड किंवा दगड खोदण्याचें एक हत्यार, विंधणें.
घिसाडी (ना.)–लोखंड घडून त्याचीं हत्यारें करणारा.
ऐरण (ना.) कांकडांत बसविलेला एक चौकोनी लोखंडाचा तुकडा ज्या-वर हत्यारें वगैरे घडतात.
घण (ना.)–मोठा हातोडा.
आउतें (ना.)–हत्यारें.
मनस्वी (वि.)–पुष्कळ.
चटई (ना.)–हांतरी.
निर्वाह (ना.)–उपजीविका.
धड (क्रि. वि.)–नीट.

धडा ५६.

तादृश (वि.)–साधारण त्यासारखें. [व कसब.
कलाकौशल्य (ना.)–विद्या
अडथळा (ना.)–हरकत अटकाव.
नौका (ना.) गलबत, तारूं.
विसांवा (ना.) विश्रांति.

अवजार (ना.) शीड.
थांकडें चालणें—कजे आणि
भांडणें करणें.
अभिमान (ना.)—गर्व, ताठा.
तिरस्कार (ना.)—कंटाळा.
वेडेपणा (भा.ना.)—मूर्खपणा.

घडा ५७.

अणीदार (वि.)—टोंकदार.
पंजा (ना.)—नखें व बोटें
यांसुद्धां हाताचा पुढचा
भाग. [ळेकीं.
संकुचित (वि.) आंखूड-
धूर्त(वि.)—लबाड. [पोकळी.
कपार (ना.) डोंगरांतील
शिताबी (ना.)—चलाखी,
कुशलता.
रोंवून (धा.)—खुपसून.
आटोका (ना.)—सपाटा.
ढुंगण (ना.)—बसलें असतां
जो भाग जमिनीला ला-
गतो तो. [आवड.
आसक्ति (ना.)—इच्छा,
लगटून (धा.)—चिकटून,
भिडून. [बदल.
धोरपालट (ना.)—भारयाचा
उपद्रव (ना.)—त्रास.

घडा ५८.

कोंकणस्थ (वि.)—ब्राह्मणां-
तील एक भेद आहे.
सडे (वि.) एकटे.
साहित्य (ना.)—जिन्नस,
लागणारे पदार्थ.
दिवस साजरा केला पाहिजे—
उद्यांच्या सणाचे दिवसा-
करितां कांहीं गोड करून
दिवस आनंदकारक हो-
ईल असें केलें पाहिजे.
चिजा (ना.)—वस्तु. [नी.
दुतर्फा (क्रि.वि.)—दोहों बाजूं-
रांगा (ना.)—ओळी.
ठिकी (ना.)—पोतें, पिशवी.
किरांणा (वि.)—किरकोळ.
मंडपी (ना.)—काठ्या एकावर
एक सारख्या बांधून के-
लेली असते ती.
बुट्टीदार (वि.)—टिपकेटि-
पके दिलेले.
गंधी (ना.)—अत्तर गुलाब
वगैरे सुंगधी पदार्थ वि-
कणारे.
माळी (ना.)—फुलें विकणारे.
खरेदी (ना.)—विकत घेणें.

पासंग (ना.)—वजन बरोबर होण्यास घालतात तें.

पासंगासही लागावयाचें नाहीं—तें त्याच्याशीं तोलून पाहिलें असतां अतिशय भिकार दिसतें.

भांबावला (धा.)—गोंधळला.

चैन भोगणें—मजा मारणें.

धडा ५९.

इहलोक (ना.) हा लोक, मृत्युलोक.

कर्तव्यकर्म (ना.) जें काम अवश्य केलें पाहिजे तें.

लक्षून (धा.)—संबंधाची.

मळीणपणा (भा. ना.)—धामटपणा. [रणारा.

बाधक (वि.)—अपकार करणारा.

धर्मनिष्ठा (ना.)—धर्मावर

स्थळ (ना.)—जागा. [भरंवसा

उपेक्षा (ना.)—हयगय.

महामारी (ना.)—पटकी.

क्षेत्र (ना.)—तीर्थाची जागा, पुण्यस्थळ.

घाण (ना.)—दुर्गंधि.

सांचू देणें (क्रि.)—जमूं देणें.

स्वीकार (ना.)—अंगीकार.

धडा ६०.

शांति (ना.) सहन करण्याचें अंगीं असणारें सामर्थ्य.

निश्चिंतपणा (भा. ना.)—मनांत चिंता नसणें.

होकायंत्र (ना.)—समुद्रांत दिशा दाखविणारें यंत्र.

मरसोड (ना.) दोन्हीपक्षांचा स्वीकार करून त्यांपैकीं कोणत्याही एका पक्षास चिकटून न राहणें.

समाधानाचें घर—अतिशय समाधान.

नागमोडी (ना.)—सर्प चालतांनी नेहमी वांकडीतिकडी वळणें घेतो त्याप्रमाणें.

धडा ६१.

परस्पर प्रीतीविषयीं उदाहरण (कविता).

कवितेंतील शब्दार्थ.

गवसला (क्रि.)—सांपडला.

गोधूम (ना.)—गहूं.

परि (अ.)—परंतु.

गेह (ना.)—घर.

तोरें (ना.)—गर्वानें.
दुष्टबुद्धि (ना.)—वाईट बुद्धि ज्याची आहे तो.
गैर (वि.) मुर्ख. [स्वछंदानें.
स्वैर (क्रि. वि.)-स्व+ईर)-
क्रमितां (धा.)—चालतांना.
पिपीलिका (ना.)—मुंगी.
आली (ना.)—सखी, मैत्रीण.
सुजनपणा (भा. ना.)—मनाचा उदारपणा, चांगुलपणा.
श्रवणीं (ना.)—कानीं.
ओष्ठ (ना.)—ओंठ.
स्वईष्ट (ना.)—आपलें हित चिंतणारा.[विद्वान् लोक.
शिष्ट (ना.)—सभ्य लोक,
परस्पर (स.)—एकमेक.
जीवजंतु (ना.)—लहानप्राणी.
शिशु (ना.)—बालक.

मूळ कविता.

आर्या.

एक्या लहान काळ्या, मुंगीला गवसला बहू थोर ॥
दाणा गोधूमाचा पेरि उचलेना जरी करी जोर ॥ १ ॥

अन्वयः—एक्या लहान काळ्या मुंगीला बहू थोर गोधूमाचा दाणा गवसला; जरी जोर करी परि उचलेना.

अर्थः—एका लहान काळ्या मुंगीला एक फार मोठा गव्हांचा दाणा सांपडला. तो उचलण्याकरितां तिनें आपल्याकडून पुष्कळ जोर केला, परंतु तिच्यानें तो उचलवेना.

टीप—येथें 'परि' हा शब्द 'तरि' याच्या ऐवजीं आला आहे.

तेव्हां दैवें तीच्या, दृष्टी पडला तिचाच शेजारी ॥
प्रार्थुनि म्हणे तयाला, गेहा न्यायास दे मदत भारी ॥ २ ॥

अन्वयः—तेव्हां तीच्या दैवें तिचाच शेजारी दृष्टी पडला; तयाला प्रार्थुनी म्हणे, गेहा न्यायास भारी मदत दे.

अर्थः—इतक्यांत तिच्या नशीबानें तिच्याच घराजवळचा एक मुंगळा तिच्या दृष्टीस पडला. त्याची विनंती करून

ती म्हणाली, बा, एवढा दाणा माझ्या घरीं नेण्यास मला तुझी पुष्कळ मदत दे.

माझें आहे मजला, कार्य पहाया असें वदे तोरें ॥
आणि म्हणे इच्छिसि जरि गे ने तो तूंच आपुल्या जोरें ॥ ३ ॥

अन्वयः—मजला माझें कार्य पहाया आहे, असें तोरें वदे; आणि म्हणे, गे, जरि इच्छिसि, (तरि) तो तूंच आपुल्या जोरें ने.

अर्थः—मला माझें काम करावयाचें आहे असें तो गर्वानें बोलला आणि ह्मणाला, अगे, जर तुला हा गव्हांचा दाणा पाहिजे असेल तर तूंच आपल्या जोरानें तो उचलून ने.

ऐसें वदूनि चालु, झाला तो दुष्टबुद्धि अति गैर ॥
धावत धावत गेला, आपुल्या गेहीं निजावया स्वैर ॥ ४ ॥

अन्वयः—ऐसें वदूनि तो अति गैर (व) दुष्टबुद्धि चालू झाला, आपुल्या गेहीं स्वैर निजावया धावत धावत गेला.

अर्थः—असें बोलून फार मूर्ख व मनांत वाईट बुद्धि धरणारा असा तो मुंगळा तेथून चालता झाला; आणि स्वच्छंदानें निजण्याकरितां आपल्या घरीं धांवत धांवत गेला.

इतुक्यामध्यें दुसरी, मार्ग क्रमितां पिपीलिका आली ॥
गेली मदत कराया, संकटि पाहूनि आपली आली ॥ ५ ॥

अन्वयः—इतुक्यामध्यें दुसरी पिपीलिका मार्ग क्रमितां आली. आपली आली संकटिं पाहूनि मदत कराया गेली.

अर्थः—इतक्यांत दुसरी मुंगी वाटेनें जातां जातां त्या ठिकाणीं आली; व आपली मैत्रीण संकटांत आहे असें पाहून तिला मदत करण्यास गेली.

टीपः—१ ही दुसरी मदतीस आलेली मुंगी व हा पहिला दुष्ट मुंगळा यांच्या स्वभावांत केवढें मोठें अंतर आहे तें पहा. त्या मुंग-

क्यानें तिजला मदत केली असती तर त्याचेंही भलेपण त्या मैत्रिणीच्या भलेपणासारखें दिसून आलें असतें। परंतु ज्याचा दुष्ट स्वभाव त्याला हें कधींही कळावयाचें नाहीं. मुलांनो, याप्रमाणेंच तुम्हा आपल्या हातून मदत होण्यासारखी असली तर, संकटांत पडलेल्या मनुष्यांस अवश्य मदत करीत जा, त्यांत तुमचें आंगचें चांगुलपण दिसून येईल.

पोंचवि तिला तिच्या त्या, गोधूमासह गृहास नेऊन ॥
दाखवि सुजनपणातें, ऐशा मोठ्या श्रमास घेऊन ॥ ६ ॥

अन्वयः—तिच्या त्या गोधूमासह तिला गृहास नेऊन पोंचवि. ऐशा मोठ्या श्रमास घेऊन सुजनपणातें दाखवि.

अर्थः—त्या दुसऱ्या मुंगीनें तिच्या त्या गव्हांच्या दाण्यासह तिला घरास घेऊन पोंचविलें; आणि असे मोठे श्रम घेऊन त्या मैत्रिणीनें आपल्या मनाचा उदारपणा दाखविला.

ज्यांच्या ज्यांच्या श्रवणीं, पिपीलिकेची पडेल ही गोष्ट ॥
ते हालवुत कराया, बाळांतें बोध आपुले ओष्ठ ॥ ७ ॥

अन्वयः—ज्यांच्या ज्यांच्या श्रवणीं ही पिपीलिकेची गोष्ट पडेल ते बाळांतें बोध कराया आपुले ओष्ठ हालवुत.

अर्थः—ज्यांच्या ज्यांच्या कानीं ही मुंगीची गोष्ट पडेल त्या सर्वांनीं मुलांना असा उपदेश करण्याकरितां आपले ओंठ हालवावे; ह्मणजे तोंड दाबून न धरितां दोन उपदेशाचे शब्द तोंडांतून काढावे.

टीपः—१ असा=मुंगीनें आपला सुजनपणा कसा दाखविला आणि मुंगळ्यानें आपला दुष्ट स्वभाव कसा दाखविला याविषयीं बोध.

ती सुस्वभाव मुंगी, गेली साह्यास जी स्वइष्टातें ॥
बोध करी बाळांतें, जो होइल मान्य सर्व शिष्टातें ॥ ८ ॥

अन्वयः—जी स्वइष्टातें साह्यास गेली ती सुस्वभाव मुंगी जो सर्व शिष्टातें मान्य होइल (तोच) बोध बाळांतें करी.

अर्थः—आपल्या मैत्रिणीच्या मदतीस गेलेल्या त्या चांगल्या

स्वभावाच्या मुंगीनें दाखविलेल्या उदाहरणापासून जो सर्व विद्वान् लोकांना पसंत पडेल तोच उपदेश सर्व मुलांना प्राप्त होवो.

जर करिती प्रेमातें, परस्परें जीवजंतु अतिनीच[२] ॥
तर पाहिजे शिशूंच्या, मध्यें ती प्रेमबुद्धि असलीच ॥ ९ ॥

अन्वयः—जर अति नीच जीवजंतु परस्परें प्रेमातें करिती, तर ती प्रेमबुद्धि शिशूंच्यामध्यें असलीच पाहिजे.

अर्थः—अतिशय लहान प्राणी देखील एकमेकांवर प्रीति करितात असें जर आपण नित्य पाहतों, तर तीच एकमेकांवर प्रेम करण्याची इच्छा बाळकांमध्यें सुद्धां असलीच पाहिजे.

टीपः—१ प्रेमातें=प्रेमाला (द्वितिया विभक्ति.) २ मुंगी, माशी किडे इ० अगदीं क्षुद्र प्राणी आहेत, व त्यांना मनुष्याप्रमाणें परमेश्वरानें बुद्धि दिली नाहीं. असें असतां ते एकमेकांवर प्रीति करितात. परंतु मनुष्यजातीस परमेश्वरानें बुद्धि दिली असतां त्यांनीं एकमेकांवर प्रीति न करणें म्हणजे अति नीच प्राण्यापेक्षांही आपण नीच होण्याप्रमाणें आहे.

धडा ६२.

संक्षिप्त (वि.)—थोडक्यांत.
महाल (ना.)—परगणा.
सोई (ना.)—रोजगार, चाकरी.
मयत (वि.)—मेलेला.
मांडिलें (क्रि.)—स्थापिलें.
मदतगारी (ना.)—सहाय्य.
खेप (ना.)—फेरी, सफर.
पुंजी (ना.)—भांडवल.
साख (ना.)—पत.
भांडवल (ना.)-व्यापारकरितां जी रक्कम उभी करितात ती.
सफर (ना.)—खेप.
बंदिशाळा (ना.)—तुरुंग.
औदार्य (भा. ना.)—उदारपणा, मोठेपणा.
औदार्य झऱ्याच्या पाण्यासारखें वाहत होतें—झऱ्याचें पाणी ज्याप्रमाणें कधींही बंद होत नाहीं त्याप्रमाणें

त्यानें जीं औदार्याचीं कृत्यें केलीं होतीं तीं सतत चालू होतीं.
वृद्धिंगत (क्रि. वि.)-वाढत.
अग्यारी (ना.)-पारसी लोकांची अग्निहोत्राची व प्रार्थनेची जागा.
परचुरण (वि.)-किरकोळ.
सूतिकागृह (ना.)-प्रसूत होण्याकरितां घर. [संबंधीं.
मेडिकल (वि.)-वैद्यकी-
कॉलेज (ना.)-पाठशाळा.
प्रोफेसरशिप् (ना.)-विद्यागुरूची जागा.
दरबार (ना.)-राजसभा.
रत्नखचित चांद-हिरे माणकें लावलेलें पदक.

घडा ६३.

मदार (ना.)-मानेजवळील उंचवटा. [प्रमाणें वांकदार.
कमानदार (वि.)-कमानी
सडपातळ (वि.)-सडसडीत, फार लठ्ठ व फार बारीक नव्हे तो. [उंचवटा.
घट्टा (ना.)-मांसाचा कठीण
कह्यांत (ना.)-हुकुमांत.
निर्जल (वि.)-जेथें पाणी नाहीं असा. [राचा हेतु.
ईश्वरीसंकल्प (ना.)-ईश्व-
भुसभुशीत (वि.)-सुळसुळीत, जिचा प्रत्येक कण अगदीं निराळा आहे अशी.
सांडणी (ना.)-उंटाची मादी. [धान्य.
सातु (ना.)-एकप्रकारचें
मजल (ना.)-टप्पा.
अरण्यनौका (ना.)-रानांतील तारूं, ज्याप्रमाणें तारूंशिवाय समुद्रांतून जातां येत नाहीं, त्याचप्रमाणें मोठमोठ्या वाळवंटांतून उंटाच्या साह्याशिवाय जातां येत नाहीं म्हणून उंटाला नौकेची संज्ञा दिली आहे.

घडा ६४.

गेळें (ना.)-दुभागलेले खूर.
ठीक (क्रि. वि.)-बरोबर.

घडा ६५.

लोंकर (ना.)-मेंढरूं इत्यादिकांचे आंगावरील ऊबदार केंस.

कडा (ना.)—डोंगराचा तुटलेला दगडी भाग.
अवघड (वि.)—कठीण, विकट. [रचे केंस.
दाढी (ना.)—हनुवटीव-
विशेष (ना.)—अधीक भेद दाखविणारी. [वारा.
वाफ (ना.)—तोंडांतील उष्ण
चोखाळ (वि.)—निर्मळ, स्वच्छ. [गवत.
पेंढें (ना.)—एका जातीचें
सागोती (ना.)—मांस.
गोजिरवाणी (वि.)—देखणी, सुरेख.
नवल (ना.)—आश्चर्य.
शहाणपणा(भा.ना.)—अक्कल.

धडा ६६.

जड (वि.)—मंद.
सुस्त (वि.)—आळशी.
खडपा (ना.)—सुळका.
योग्यता (भा.ना.)—सामर्थ्य.
ठेवण (ना.)—रचना.
वागणूक (ना.)—चालचर्या.
चपळ (वि.)—सुस्त नव्हे तें, चलाख.
निसरणें (धा.)—घसरणें.
डगलें (ना.)—अंगरखा.
सकलाद (ना.)—बनात.
कातडें (ना.)—चामडें.
पनीर (ना.)—दुध आटवून जो खवा कारितात तो.
उंची (वि.)—फार किंमतीचें.
बनतें (क्रि.)—तयार होतें.
मेहेरबानी (ना.)—उपकार.

धडा ६७.

गप्प (ना.)—खोटी बातमी.
डोळे फिरणें—खाली पाहि-ल्याबरोबर घेरी येणें.
खोली (ना.)—उंची.
सावधगिरी (भा. ना.)—काळजी, दक्षता.
नेटावा (ना.)—टेंका.
युक्ति (ना.)—उपाय.
पार पडली—निभावली.
पिटली (क्रि.)—वाजविली.
गत (ना.)—परिणाम, शेवट.
उपाशी (क्रि. वि.)—अन्ना-शिवाय. [सोडणें.
प्राणास मुकणें—मरणें, प्राण-
हार मानणें—मुकाट्यानें बस-णें; तोटा सोसणें.
राजी (क्रि. वि.)—कबुल.

समाप्त.

पोतदारांची शालोपयोगी पुस्तकमाला.

	किंमत आणे
अंकगणित (पोतदारांचें, सुधारून वाढविलेली आ. २० वी.)	६॥
मोडीपत्रव्यवहार रीति	३
मोडीवाचनसार भाग १ ला दुसऱ्या इयत्तेकरितां	३
मोडीवाचनसार भाग २ रा तिसऱ्या इयत्तेकरितां	३
मोडीवाचनसार भाग ३ रा चवथ्या इयत्तेकरितां	५
मोडीवाचनसार भाग ४ था ५ व्या व ६ व्या इयत्तेकरितां ...	७
मुंबई इलाख्याचें संक्षिप्त वर्णन	०॥।
हिंदुस्थानचें संक्षिप्त वर्णन	१
एशिया व यूरोप खंडांचें संक्षिप्त वर्णन	१
आफ्रिका व अमेरिका खंडांचें संक्षिप्त वर्णन	१॥
महाराष्ट्रदेशाच्या इतिहासाचें संक्षिप्त वर्णन	१॥
हिंदुस्थानचा संक्षिप्त इतिहास (इतिहाससार)	२॥
चित्रबोध भाग १ ला, पृष्ठें ५२ चित्रें १८६ कायम ठशांनीं टैपांवर छापलेला. (एक लक्ष प्रति)	१
चित्रबोध भाग २ रा १ ल्या इयत्तेकरितां टैपांवर छापलेला.	१
बालज्ञानसुधा–यांत सर्व मुळाक्षर, बालबोध व मोडी वाचन, व्यवहारीक माहिती व गणित इतके विषय आहेत. ...	१॥
गद्यपद्यार्थबोध भाग १ ला व २ (एकत्र) अथवा मराठी १ ल्या व २ ऱ्या पुस्तकांतील कठिण शब्दांचे अर्थ व कवितांचें सान्वयस्पष्टीकरण	२
गद्यपद्यार्थबोध भाग ३ रा अथवा म० ३ ऱ्या पु० कठिण शब्दांचे अर्थ व कवितांचें सान्वयस्पष्टीकरण	२॥
गद्यपद्यार्थबोध भाग ४ था अथवा म० चवथ्या पु० कठिण शब्दांचे अर्थ व कवितांचें सान्वयस्पष्टीकरण	४
गद्यपद्यार्थबोध भाग ५ वा अथवा म० ५ व्या पु० कठिण शब्दांचे अर्थ व कवितांचें सान्वय स्पष्टीकरण	६
हॉवर्डकृत इंग्रजी पहिल्या पुस्तकांतील फक्त शब्दार्थसंग्रह ...	१
हॉवर्डकृत इंग्रजी प० पु० शब्दार्थ व भाषांतर टीपांसह ...	२॥
हॉवर्डकृत इं० दुसऱ्या पुस्तकांतील शब्दार्थ फ्रेजिससह ...	२॥

मोडी दुसऱ्या पुस्तकांतील शब्दार्थ.

धडा १ ला.

संक्षेप–थोडक्यांत लिहिणें.
ताजाकलम–अधिक मजकूर.
निशाणी–खूण, चिन्ह.
निसबत–मार्फत.
धोरण–कल, रोख.
पेटा–तालुक्याचा भाग.
व्यवहार–रूढि.
असिस्टंट–हाताखालचा.
अकटिंग–बदली.
आवक–आलेल्या पत्रांची [नोंद.
किरकोळ–थोडें.
किताबत–पदवी.
किंमत–मोल.
कसबे–मोठा गांव.
खरेदी–विकत घेणें.
गुजारत–मार्फत.
गुदस्त–मागील (वर्षी.)
जमादीलाखर } मुसलमानी म-
जमादीलावल } हिन्यांचीं नांवें.
जावक–जाणाऱ्या पत्रांची नोंद.
जिल्हा–इलाख्याचा भाग.

जिराईत–माळजमीन.
तपशील–कच्चा मजकूर.
तागाईत–पर्यंत.
तरफ–पक्ष, बाजू.
तेरीज–बेरीज.
दिमत–ताबा.
पोष्य-संरक्षण करण्यास योग्य.
पैमाष–मोजणी.
प्रांत–भाग.
बीकलम–कलमवार.
बीतपशील–तपशीलवार.
बुदरुक–जुनें, जुना गांव.
बेशमी–मायना.
मुलकी–देवघेवीचे.
मशरू–मायना.
मुक्काम–ठिकाणा.
मुदत–वेळ, अवकाश.
मुदल–भांडवल.
मशार-वर सांगितलेला मनुष्य.
मिती–तारीख.
मित्रवर्य–उत्तम स्नेही.
वलद–बिन, चा.
विद्यमान–हल्लीं.

निसरडें—घसरडें.
तोंडघशीं—उपडी.
सैन्य—फौज, लष्कर.
अपशकून—दुश्चिन्ह.
त्वरेनें—जलदीनें, घाईनें.
उमेद—हुषारी.
शत्रु—वैरी. [ऊन.
निकरानें—जिवावर उदार हो-
जय—यश.
गादी—तक्त.
वंश—पिढी, कूळ.
प्रसंगीं—वेळीं.
हातपाय गाळणें-धीर सोडणें.
चिरकाल—निरंतर, सदोदित.
उत्साह—हुशारी,हिंमत. [जाणें.
कार्यसिद्धी—काम शेवटास
शकून—प्रश्न पाहणें.
प्रवृत्त—सिद्ध, तयार.

घडा ८ वा.

फिरस्ता—प्रवासी.
विक्री—विकणें.
झुंडी—थवे, टोळ्या.
कडक—जालीम.
गाठोडें—बोचकें.
गाढ—स्वस्थ.
चकित—विस्मित.
किलकिलाट-गोंगाट,गलबला.
गजबजून—भरून.
नकल्या—चेष्टेखोर.
कृत्य—करणी.
सुशोभित—शोभिवंत.
ठकांनो—लबाडांनो.
पटापटा—झपाझप.

घडा ९ वा.

इच्छी—आशा करी.
घडो—होवो.
सेवा—चाकरी.
हेवा—मत्सर.
तृप्ति—संतोष, समाधान.
पसारा—विस्तार.
स्वजन—आपले लोक.
विनोदार्थ—करमणुकेसाठीं.
जीवनार्थ—उपजीविकेसाठीं.
रंजनार्थ—करमणुकेसाठीं.
कृपेचा सागर—फार दयाळू.
सौख्याचें—सुखाचें.
आगर—घर, जागा.
द्वेष—वांकडें.
स्नेह—मैत्री.
सर्प—साप.
उशाला—डोक्याखालीं.
क्रोध—राग.

सत्वर—लवकर.
गळावा—जावा.
देह—शरीर.
काम—इच्छा, हेतु.
जग—पृथ्वी.
भवपथ—संसारमार्ग.
बिकट—अवघड, कठीण.
वारील—दूर करील, नाहींसें करील.
संकट—दुःख.
मार्गदर्शक—वाट दाखविणारा.
प्रवीण—निपुण, तरबेज.
भवजाळ—संसाराची गुंतागुंत.
त्वत्पदीं—तुझ्या पायीं.
विसावा—विश्रांति.

धडा १० वा.

खाण—ज्या ठिकाणीं धातु वगैरे खनिज पदार्थ सांपडतात ती जागा.
अशोधित—शुद्ध न केलेले.
भट्टी-पदार्थ अग्नींत घालून शुद्ध करण्यासाठीं बांधलेली असते तीस 'भट्टी' म्हणतात.
चकातात—लखलखतात.
हातवडा—घण.
घनवर्धनीय—हातवड्यानें ठोकिलें असतां वाढतो तो.

धडा ११ वा.

उत्तम—नामी, उत्कृष्ट.
मिसळकेलें—एकांत एक झालेलें.
आटविलें—रस केला.
फेरफार—बदल, पालट.
गंजत नाहीं—गंज येत नाहीं.
दागिने—अलंकार.
चिवट—लवचिक.
मुलामा—गिल्हई.
मौल्यवान—मोठ्या किमतीची.

धडा १२ वा.

तांबूस—काहींसा तांबडा.
नाद—आवाज.
खप—विक्री.
छपर—घराचें मोहळ.
तारू—गलबत.
इजा—दुःख, त्रास.
बुडांस—तळांस.
काळंकतात—नासतात.
खबरदारी—सावधगिरी.
वापरणें—उपयोगांत आणणें.
कल्हई—कथलाचा मुलामा.
प्रख्यात—प्रसिद्ध.
मूर्ति—प्रतिमा.

धडा १३ वा.

मऊ—नरम.

पुड-भुकटी. [घास.
पितळावयास--पातळ व्हाव-
कळकूं नये--नासूं नये.
सफेता--पांढरा रंग.
विषयुक्त--विष मिसळलेले.
हौद--मोठी टांकी.
प्रदेश--प्रांत.
थिजतो--दाट होतो.

धडा १४ वा.

शुद्ध--चोख.
रंज--मळ.
धंदा--उद्योग. [सामान.
आउतें--शेतकीचें नांगर वगैरे
हत्यारें--शस्त्रें.
घमेलीं--पातेलीं.
पोलाद--तिखें.
वैभवास--ऐश्वर्यास.

धडा १५ वा.

स्तुति--गुणाचें वर्णन.
व्यर्थ--उगीच, फुकट.
नराची--मनुष्याची.
पात्र--योग्य, लायक.
मानव--माणूस.
बघतों--पाहतों.
ध्वनि--शब्द, आवाज.
परिसतों--ऐकतों.
पदीं--पायांनीं.
जिव्हा--जीभ.
चाखतों--चव घेतों.
मधुर--गोड.
वाचा--बोलणें, वाणी.
बहुसाळ--पुष्कळ प्रकारची.
विश्रांति--विसावा.
झोंप--निज, निद्रा.
सर्वज्ञ--सर्व जाणणारा.
सकरुणा--दयाळू.
दयासागरा--दयेच्या समुद्रा.
म्ह० फार दयाळू.
अज्ञ--अजाण, जाणतीं नव्हत
कोप--राग. [अशीं.
करुणस्वरें--दीनवाणीनें.
विनवितों--विनंति करितों.
आस--आशा.
दयानिधे--फार दयाळू.
बुद्धि--जाणण्याची शक्ति.
वासना--इच्छा.
आवरीं--आटपून धर.
देह--शरीर. [करतोस.
रक्षिसी--राखतोस, संरक्षण
पोशिसी--पोषण करतोस.
ज्ञान--अक्कल.
तारिसी--सोडविलोस.

कृपेविण–दयेवांचून.
आसरा–आधार.

घडा १६ वा.

खोल–ओंड.
भक्कम–मजबूद.
घेर–परिघ.
करवे–दांते.
तुळई–वार, वहाक.
जुंपतात–बांधितात.
खोबण–खांचणी.
पन्हाळी–नळी
सांचविणें–जमविणें.
नांद–एक प्रकारचें भांडें.
आंबतो–आंबट होतो. [येतो.
उतास जातो–उसळून वर
फडकरी–ऊंस कापणारे.
मोळके–मोळीवाले.
पेरी–कांडीं.
कांडक्या–कापणारा.
चरक–घाणा, रगाडा.
काहील–मोठी कढई.
कोरडीं–सुकीं.
चिपाडें–चुंवळें.

घडा १७ वा.

उगवतो–वर येतो.
मावळतो–नाहींसा होतो.
मुक्त्यासारख्या–मोत्यासारख्या.
उघड–अर्थात्.
निश्चित–नेमका. [णार नाहीं.
विसरणार नाहीं-लक्षांतून जा-
बारकाईनें–बारीक नजरेनें.
नक्की–खचीत.
कोंपरा–कोन.
थेट–नीट.
सोपें–सुलभ.

घडा १८ वा.

आकार–आकृति.
हुबेहूब–जशाचा तसा.
तसबीर–चित्र.
फरक–भेद, तफावत, फेर.
प्रतिमा–आकार, मूर्ति.
सरासरी–साधारण.
कामगार–अंमलदार.
हद्द–सीमा.
गंमत–मजा.

घडा १९ वा.

उद्योग–धंदा, काम.
विद्यार्थी–विद्या शिकणारे.
परस्परांवर–एकमेकांवर.
प्रीती–ममता, माया.
दुर्लक्ष्य–हयगय.
वाखाणणी–स्तुति.

पसंत—मान्य.
खिन्न—उदास.
मुद्रा—चेहरा.
उतरलें—फिकें पडलें.
स्मरतें—आठवतें.
रोजगार—चाकरी.
लौकिक—कीर्ति.
व्यर्थ—फुकट, वायां.
हवाला—विश्वास, भरंवसा.
कचित्—थोडें.
आयतें—मेहनत केल्याशिवाय.
श्रम—मेहनत.
सामग्री—साठा, बेगमी.
निर्माण—उत्पन्न.
कांतून—साफ करून.
क्षुल्लक—हलकी.
साध्य होणें—मिळणें.
द्रव्यलाभ—पैसा मिळणें.
मतलब—भावार्थ.

धडा २० वा.

नित्य—दररोज.
सेवा—चाकरी.
वर—आशिर्वाद.
शक्ति—बळ, सामर्थ्य.
संपत्ति—पैसा, धन.
विश्व—जग.
कीर्ति—लौकिक.
गाई—गातात, गाती.
तारे—आकाशांतील स्थिर [पदार्थ.
तेजःपुंज—तेजस्वी.
भांडारीचे—खजिन्यांतले.
हिरे—एका प्रकारचीं रत्नें.
प्रवाहीं—ओघांत.
दुष्ट वासना—वाईट इच्छा.
चित्त—मन.
शुद्ध—निर्मळ.
पापमळीं—पापरूप चिखलांत.
नाहातों—आंघोळ करितों.
लोभ—ममता.
विसांवा—विश्रांति.
अन्य—दुसरा.
दीनावरी—गरीबावर.
कृपा—दया.
संकट—विघ्न.
निवारीं—नाहींशी कर.
निराधारी-ज्याला आधार नाहीं [असा.
पदरीं—पदरांत.
मातेसम—आईसारखा.
कळा—प्रीति, माया.
प्रेमें—आवडीनें.
शरण—लीन.
भावें—भक्तीनें.

आश्रय—आधार.
मातें—मका.

धडा २१ वा.

आटविला—कोरडा केला.
रांगेनें—हारीनें.
फटी—भेगी.
जाळ—पेट, अग्नि.
उकळी—कढ.
शिपतरानें—परडीनें.
कोंदवा—ठोकळा.
सांचवितात—जमवितात.
दोणा—लांकडाचें भांडें.
निवत—थंड होण्याकरितां.
दाट—घट्ट.
करपली—जळाली.
आवण—कढलेला रस.
थिजतां—घट्ट होतां.

धडा २२ वा.

शेजारचे—जवळचे.
हुंगली—वास घेतला.
इंद्रियद्वारा—नाक डोळे इत्यादि अवयवांच्या साधनानें.
कल्पना—मनाचा तर्क.
ऐवजी—बदली.
दर्शविलें—दाखविले.
वारंवार—पुनः पुनः
उशीर—वेळ.

धडा २३ वा.

खेरीज—शिवाय.
उपयोग—कामी पडणें.
वाक—आंबाडीचे दोर.
दोरखंड—मोठी दोरी.
तरटें—गोणपाटें.
डहाळ्या—फांद्या.
भारे—ओझीं.
कुजत—नासत.
उग्र—उग्रट.
उंची—नामी.
पोतीं—थैल्या.
कंठाळी—गोण्या.
काथा—नारळाचीं चोडें कुजत घालून जो बारीक करितात, तो.

धडा २४ वा.

मौजेनें—गमतीनें.
दृष्टि—नजर.
ममतेनें—मायेनें
उभारून—वर करून.
शेंपूट—शेंपटी.
कळवळून-वळवळून, दुःखानें कासाविस होऊन.

द्राड—खोडकर. [चार आणे.
पावली—एक रुप्याचें नाणें,
मर्जी—इच्छा.
त्वरेनें—जलदीनें, घाईनें.
लपवून—दडवून, न कळवितां.
झणझणेल—कागेल.
पेरांवर—सांध्यांवर.
खिन्न—उदास. [वांचून.
विनाकारण—उगाच, कारणा-
अपराध—गुन्हा.
नुकताच आतांच.
टोका—सपाटा.
इजा—दुखापत.

धडा २५ वा.

शिफारस—चांगल्या वर्तणुकी-
बद्दल खात्री.
नोकरीस—चाकरीस.
जाहिरात-प्रसिद्धिपत्र, नोटीस.
उमेदवार—चाकरी मिळण्या-
करितां खटपट करणारे.
अर्ज—विनंति पत्र.
पसंत—उत्तम ठरविणें. [णारा.
व्यवस्थित—आतांबेतानें वाग
मर्यादेनें—मुरवतीनें.
सभ्यपणा—पोक्तपणा.
मुद्दाम—जाणून बुजून.

गर्दी—दाटी, जमाव.
अनुमान—अटकळ. [सारखें.
खात्रीचें—भरंवसा ठेवण्या-

धडा २६ वा.

बहुशा—बहुधा, बहुतकरून.
वाळवंटांत—रेतीच्या मैदानांत.
पेंद—घड, नारळांचा समूह.
ठेंचलीं—चेंचलीं.
तंतु—बारीक दोर.
सुंभ—काथ्याची बारीक दोरी.
गाद्या—बिछाने.
खोड—कांडें.
पोखरून—कोरून.
पन्हळ—लांकूड पोखरून पा-
णी जाण्याकरितां जो
केलेला असतो तो.
ओढा—वहाळ, लहान नदी.
हंगामी पूल—पाऊसकाळा-
करितां बांधलेले पूल.
झांप—नारळीच्या झांवळ्या
वळून जे करितात ते.
वखारी-माल ठेवण्याच्या जागा.
शाकारितात—शिवतात.
सरपण—जळाऊ लांकडें.
करवंटी—नारळाचें कवच.

धडा २७ वा.

तऱ्हेचीं—प्रकारचीं.
कादलेकीं—ओथंबलेकीं.
खुंट—पानें नाहींत असा, बुंधा.
वठून—कोमेजून.
विशोभित—वाईट दिसणारें.
आग्रह—हेका, हट्ट.
खेपेस—वेळेस.
नाद—हेका, छंद.
छाया—सावली.
ओंगळ—घाणेरडा.
उतावीळ होऊन—घाईवर [येऊन.

धडा २८ वा.

तळ—बूड.
कण—रवा.
कोनाकृति—ज्याला कोंपरे आहेत असें भांडें.
सांधा—नळुना.
थिजून—आळून, घट्ट होऊन.
खुशी—मोकळीं.
स्फटिक—एक प्रकारचा पांढरा [दगड.

धडा २९ वा.

राजधानी—मुख्य शहर.
खजिना—तिजोरी.
अडचणीत—संकटांत.
इरादा—हेतु, मतलब.
मानस—इच्छा.
समाधान—शांतवन.
आगळिक—चूक.

धडा ३० वा.

आवळीं जावळीं—जुळीं.
हूड—चंचल.
ओलांडून—पलीकडे उडी [मारून.
अभिमान—गर्व.
धाडकन—एकदम.
रक्तबंबाळ—रक्तानें भरलेलें.
लगबगीनें—जलदीनें.
पेट्टी—चिरटी.

धडा ३१ वा.

सत्य—खरें.
सदा—सदोदित, नेहमीं.
सज्जन—थोर, साधु लोक.
महा—मोठें.
पाप—पातक.
परानें—दुसऱ्यानें.
निजहित—आपलें कल्याण.
समान—सारखा.
मानसीं—मनांत.
नम्रपणें—लीनपणानें, गरिबीनें
उद्धतपणा—दांडगेपणा.
जनप्रेम—लोकांची प्रीति.
सख्य—एकी, मैत्री.

सौख्य–सुख.
त्यजूनियां–टाकून.
निरत–तत्पर.
वदति–बोलतात.
नीच–कनिष्ट, हलका.
अडला–संकटांत पडला.
साह्य–मदत.
सुज्ञ–जाणता, समजदार.
परोपकारी–दुसऱ्यावर उपकार करणारा.
गणती–पार, सीमा.
शक्त्यनुसार–सामर्थ्याप्रमाणें.
अल्प–थोडा.
सत्कर्माचा–चांगल्या कामाचा.
भार–ओझें.

धडा ३२ वा.

मालक–धनी.
संभाषण–बोलणें.
सबंध–सगळा, सर्व.
अगर–अथवा.
डोळा–कोंब फुटण्याची जागा.
आळीं–खाडे.
ओळीनें–रांगेनें.
ढीग–रास.

धडा ३३ वा.

मुजरा–रामराम.
खोपींत–झोंपडींत.
मानेल–पचेल.
पुष्ट–लठ्ठ.
दमदार–जोरदार.
बस–पुरे.
निगा–व्यवस्था, जतन.
परत–मागें.

धडा ३४ वा.

वादळें–तुफानें, जोळें.
हाकारण्याचें–चालविण्याचें.
समारंभ–उत्साह.
हेतु–कारण, उद्देश.
वहिवाट–चाल, प्रचात.
गर्जना–गडगडाट.
सांत्वन–समाधान.
अर्पण करितात–वाहतात, टाकतात.
शक्ति–ऐपत, सामर्थ्य.

धडा ३५ वा.

निर्वाह–पोट भरणें, उदरपोषण.
वसूल–सरकार सारा, दस्त.
गुन्हे–अपराध.
मार्फत–हुकुमानें, तर्फेनें.
ठराव–निकाल.
खातीं–भाग.
जबाबदारी–जोखीम.

वरिष्ठ—मोठा, श्रेष्ठ.
हुकूम फर्माविणें-हुकूम करणें.
व्यवस्था—बंदोबस्त.

धडा ३६ वा

घडलें—झालें.
अर्थ—मतलब.
पुरा—पूर्ण.
ओळखावें—समजावें.
दक्षिणा—ब्राह्मणांस धर्मादाय दिलेला पैसा.
समजूत—माहिती.
हर्ष—आनंद.
शोक—दुःख.
मनोविकार—मनांतील क्रिया.
जाणते—शहाणे, मोठे.

धडा ३७ वा.

वर्ततो—वागतो.
वदे—बोले.
सदाचार—चांगली वागणूक.
शास्त्रार्थ—शास्त्राच्या गोष्टी.
भल्याच्या—चांगल्या माणसाच्या.
संगानें—सहवासानें.
अवगुण—वाईट गुण.
खळ—दुष्ट, वाईट.
सुगुण—उत्तम गुण.
लोपत असे—नाहींसा होतो.
घन—मेघ.
फणी—सर्प, साप.
दुग्ध—दूध.
गरळ—विष.
वमती—ओकती, टाकतात.
सवें—बरोबर.
संगती—सोबत.
मान्यता—मोठेपणा.
अन्यथा—नाहींतर.
स्मरा—आठवा.
मातृसेवा—आईची चाकरी.
सुस्वभाव—उत्तम स्वभाव.
लज्जा—टाका.
वैरभाव—द्वेषबुद्धि.
सौख्य—सुख.
बोधित—उपदेश करीत.
उगीच—रिकामे.
विद्यालयीं—शाळेंत.
बोल—शब्द, ठपका.

धडा ३८ वा.

शिखरें—टोकें.
वृष्टि—वर्षाव.
माथा—वरचा भाग.
वितळून—पातळ होऊन.
भेग—चीर, फट.
भुसभुशित—पोकळ.

मुरते—जिरते.
पुरवठा—बेगमी.
वनस्पति—झाडपाला.
कायम—स्थिर.
सतत—नेहमीं, सदोदित.
फाजील—जास्त, अधिक.
निर्वाह—पोषण.
गाळ—मळ.
सुपीक—पिकाऊ.
धरणें—बांध.

धडा ३९ वा.

बोंडें—फळें.
उकलत—उघडत.
चिवटीं—गुंड्या. [साळी.
कोष्टी—कापड विणणारे,
खपतें—विकतें.
सरक्या—कापसाच्या बिया.
गड्डे—बोजे.
निदान—कमींत कमी.
अजमास—अटकळ, अंदाज.
लागला पाहिजे—मिळाला
टक्के—रुपये. [पाहिजे.
पिंजून—पिंजरून.
गुंडी—गुंडाळें.
भांडवल—व्यापारांत घातलेला
पैसा.
चाती—भिंगरी.
दशेस—स्थितीस.

धडा ४० वा.

आढळलें—समजलें.
ओढाळ—उनाड.
आवरेना—आटपेना.
विनवणी—विनंति.
निभाव—ठिकाव.
काकुळतीनें—लीनपणानें.
आरोळी—मोठी हांक.
हिस्सा—वांटा, भाग.
संशय—अंदेशा, वहिम.
उदार—थोर मनाचीं. [तुकडे.
नाणें—धातूचे छाप मारलेले
गांठून—भेटून.
कोठीवाला-जिन्नस पुरविणारा.
घाबरला—भ्याला.
वागणूक—रीत, चाल.
कौतिक—कीर्ति.
अंतरलास—मुकलास.
खुष—आनंदी.

धडा ४१ वा.

वारली—मरण पावली.
पिरगळला—पिळवटला.
आईवेगळा—ज्याची आई
मरण पावली असा.

आवेश—झपाटा, जोर.
नाद—छंद.
फावल्या—रिकाम्या.
खटपट-काम. [रतां येईल अशी.
माझ्या जोगतीं-मला उपयोग क-
विलक्षण—अतिशय.
डोळे वटारून—राग आणून.
शांत—सौम्य.
सद्विचार—चांगला विचार.
नाटे—आटपत नाहीं.
वाटे—मार्गाला.

घडा ४२ वा.

प्रख्यात—प्रसिद्ध. [करण्यांत.
सत्कृत्यांत—चांगलीं कामें
प्रवास—देश फिरणें.
चौकशी—विचारपूस.
सांत्वन—समाधान.
उपाय—इलाज.
अपमृत्यूनें—अपघातानें.
व्यापिलें—घेरलें.
व्याधि—इजा, पीडा.
तीव्र होऊन—अधिक होऊन.
पटकन—एकाएकीं.
गत—अवस्था.
कळ—दर्द.
कल्याण—हित, बरें.

पथ्य—नियमीत खाणें.
आभारी—उपकारी.
मुक्काम—वस्ती.
समाचार—विचारपूस.
प्रचीति—अनुभव.
बचावला—निभावला.
निर्णय—निकाल, सिद्धांत.

घडा ४३ वा.

प्रतिबंदी—दर ठरविणें.
तपासणी—चौकशी.
हालहवाल—हकीकत, स्थिति.
पिकें—उत्पन्नें.
सारा—सरकारदस्त.
दिलगीर—खिन्न, उदास.
नाखुष—असंतुष्ट.
पुढारी—प्रमुख, मुख्य.
रास्त—योग्य.
हटकून—खचीत.
साजला—लागला.
अनुसरून—धरून, लागून.
मगदुरी—कायकी, योग्यता.
ठरविला—बसविला.
कनिष्ठ—हलकी.
जाहीर—प्रसिद्ध.
फाजील—जास्त, अधिक.
निर्वेध-कांहीं हरकत न करितां.

उपरांत--नंतर.
पहाणी--मोजणी.
दोष--चूक.
काईस--ठरीव.
उत्तेजन--हिंमत.
वहिवाट--चाल.
रयत--प्रजा.
बिलकूल--अगदीं.

धडा ४४ वा.

परम--मोठा.
समर्थ--शक्तिमान. [करणारा.
दीनदयाळ--गरीबांवर दया
प्रभो--हे ईश्वरा.
जगन्नाथ--जगाचा धनी.
पदीं--पायीं.
चुकलों--अपराधी झालों.
नच--नव्हे.
अव्हेर--तिरस्कार.
क्षमा--माफी. [करणाऱ्या.
दीनवत्सला--गरीबावर दया
पराक्रम--मोठेपणा.
यश--कीर्ति, जय.
गज--हत्ती.
वाजी--घोडा.
नमितों--नमस्कार करितों.
पदातें--पायाला.
वारितें--नाहींसें करितें.
आपदा--संकट.
तारी--रक्षण कर.
अनाथा--गरीबास.
सन्निध--जवळ.
विश्वनाथा-जनांचें पालन कर-
पळोपळीं--घडोघडीं. [णाऱ्या.
बहु--पुष्कळ.
दयाघना--फार दयाळू देवा.
अतीदीन--फार गरीब.
तारिशी--रक्षण करिशी.
कृपासागर--दयाळू.
पतित--भ्रष्ट. [करणारा.
दुराचारी--वाईट आचरण
सदय--दयाळू.

धडा ४५ वा.

स्नेहांकित--मैत्रीच्या स्वाधीन.
साष्टांग--आठ अंगांसहित.
दुरुस्ती--डागडुजी.
परकेपणा--दुजाभाव.
उमेद--इच्छा.
हवाकदील--उदास.
हरतजवीज--कांहीं सोय करून.
सूट--माफी.
जंगम-एकाठिकाणाहून दुसऱ्या
ठिकाणीं नेतां येणाऱ्या वस्तु.

जप्त्या-सरकारमार्फत अटकाव
किलाव-सरकारतर्फे विक्री.
असमर्थ-ताकद नाहीं असें.
तूर्त-सध्यां.

घडा ४६ वा.

क्षेत्र-पुण्यभूमि.
संवत्सर-वर्ष.
पावेतों-पर्यंत.
आज्ञा-हुकूम.
क्रम-नियम.
झटतो-मेहनत करितो.
हमेश-नेहमीं. [यावर बोलणें.
व्याख्यान-कोणत्या तरी विष-
प्रसंग-संधि.
उपयुक्त-उपयोगाचें.
यांत्रिक-यंत्राचें.
श्रुत-ऐकिलेलें.
विज्ञापना-विनंति.

घडा ४७ वा.

मातोश्री-आई.
मुद्दाम-बुध्या.
अस्वस्थ-दुखणाईत.
तावडतोब-लागलेंच.
वरिष्ठ-श्रेष्ठ, वरचा अधिकारी.
हुंडी-दुसऱ्या ठिकाणीं पैसा
मिळण्याबद्दल रोखा.

मागेंपुढें पाहूं नये-काटकसर
करूं नये.

घडा ४८ वा.

चिरंजीव-चिरकाळ रहा.
विजयीभव-कीर्तिमान् हो.
खासगी-स्वतःच्या.
रहित-तहकूब.
विशेष-जास्त.
स्थिति-व्यवस्था.
खात्रीनें-निश्चयानें.
दोष-नांव ठेवणें.
मोकळा-रिकामा.
कल-शोंक.
नादीं-छंदाला.
हट्ट-आग्रह.
योग्य-बरें, उचित.
लक्षण-चिन्ह.
जपा-सांभाळा.
संपादन-मिळविणें.

घडा ४९ वा.

मलीका माआज्ञमा-मोठी.
बादशाहिण.
विद्यमान-तर्फे. [कारी.
मामलेदार-तालुक्याचा अधि-
हुजुरास-मुख्य कचेरीस.
अर्जदार-अर्ज करणारा.

लावणी—जागवड.
ओहळ—ओढा.
धरण—बांध.
बरसात—पावसाळा.
खलास झाला—संपला.
जबरदस्ती—बळजोरी.
प्रमुख—मुख्य.

घडा ५० वा.

चावडी—चौकी.
समक्ष—स्वतः
तपास—शोध.
आंगमेहनत-स्वतःची मेहनत.
खुलासेवार—तपशीलवार.
अजमास—अटकळ.
दाखला—पूर्वीचा लेख.

घडा ५१ वा.

हजरत—महाराज.
खुदावंत—ईश्वरासारखा.
दोनवारांत—दोन्हीवेळीं. [री.
कलेक्टर-जिल्ह्याचा अधिका-
माहालीं—महालामध्यें
अखेर—शेवटीं.
मंजुरी—कबुली.
जाहीरकरणें—कळविणें.
मनन—विचार.

घडा ५२ वा.

रेव्हिन्युसरवे-वसुलाचीपाहणी.
अस्सल—मूळची.
प्रत—नक्कल.
रवाना—पाठविणें.

मोडी दुसऱ्या पुस्तकांतील कवितान्वयार्थ.

घडा ९ वा. अभंग.

मन इच्छी हेंची देवा ॥ नित्य घडो तुझी सेवा ॥ १ ॥
नसो कोणाचाही हेवा ॥ तृप्ति असो सदा जिवा ॥ २ ॥
केला पृथ्वीचा पसारा ॥ देवा आम्हासाठीं सारा ॥ ३ ॥
स्वजनाच्या विनोदार्थ ॥ केले बहु त्वां पदार्थ ॥ ४ ॥

अन्वयः—(हे)देवा, तुझी सेवा नित्य घडो, कोणाचाही हेवा नसो, सदा तृप्ति असो, हेंची मन इच्छी. देवा, आम्हांसाठीं सारा पृथ्वीचा पसारा केला. त्वां स्वजनाच्या विनोदार्थ बहु पदार्थ केले.

अर्थः—हे परमेश्वरा, निरंतर माझ्या हातून तुझी सेवा घडावी, तसेंच कोणाचाही द्वेष मजकडून न व्हावा आणि सदा सर्वकाळ माझी वृत्ति आनंदित असावी, हीच इच्छा माझें मन करितें. हे जगदीशा, हा जो एवढा अवाढव्य पृथ्वीचा विस्तार आहे, तो सर्व आम्हांकरितांच आहे. त्याचप्रमाणें तूं आपल्या लेंकरांच्या करमणुकीकरितां नाना तऱ्हेचे पदार्थ निर्माण केले आहेस. त्यांतील—

> कांहीं केले जिवनार्थ ॥ कांहीं तसे रंजनार्थ ॥ ५ ॥
> तुझ्या कृपेचा सागर ॥ आम्हां सौख्याचें आगर ॥ ६ ॥
> द्वेष कोणाचा नसावा ॥ स्नेह सर्वांशीं असावा ॥ ७ ॥
> व्यर्थ मत्सरें कशाला ॥ सर्प घ्यावा कां उशाला ॥ ८ ॥
> क्रोध सत्वर गळावा ॥ देह तेणें न जाळावा ॥ ९ ॥

अन्वयः—कांहीं (पदार्थ) जीवनार्थ, तसे कांहीं रंजनार्थ केले. तुझ्या कृपेचा सागर (हें) आम्हां सौख्याचें आगर (आहे). कोणाचा द्वेष नसावा, सर्वांशीं स्नेह असावा. व्यर्थ मत्सर कशाला, सर्प उशाला कां घ्यावा. क्रोध सत्वर गळावा. तेणें देह न जाळावा.

अर्थः—देवा, तूं जे अनेक पदार्थ निर्माण केले, त्यांतील कांहीं पदार्थ आमच्या उपजीविकेकरितां आहेत, व कांहीं मनोरंजनास्तव आहेत. तुझा करुणासमुद्र हेंच आम्हां जीवांचें सुखदायक असें घर आहे. कोणाशीं वाकडें नसावें आणि सर्वांशीं मैत्री असावी. विनाकारण दुसऱ्याशीं हेवा कां करावा? जसें डोक्याखालीं साप घेऊन त्यावर आपण निद्रा करणें योग्य दिसत नाहीं तसें. (किंवा हेवा हाच कोणी एक साप आणि तो उशाखालीं घेऊन निजणें योग्य काय? म्हणजे मनांत कोणाचा हेवा नसावा हा भावार्थ.) राग

लवकर नाहींसा व्हावा. रागाच्या योगानें हें शरीर जाळलें जाऊं नये. आणि—

काम चित्तीं न माजावा ॥ जीव पापाला काजावा ॥ १० ॥
रक्षिसी जो सर्व जगा ॥ तो तूं सांभाळीं मज गा ॥ ११ ॥
भवपथ हा विकट ॥ कोण वारील संकट ॥ १२ ॥
नाहीं कोणी तुजविण ॥ मार्गदर्शक प्रवीण ॥ १३ ॥
भवजाळीं न फसावा ॥ व्हावा स्वत्पदीं विसावा ॥ १४ ॥

अन्वयः—(हे देवा) चित्तीं काम न माजावा, जीव पापाला काजावा. गा जो (तूं) सर्व जगा रक्षिसी, तो तूं मज सांभाळी. हा भवपथ विकट (आहे) संकट कोण वारील. तुजवीण कोणी प्रवीण मार्गदर्शक नाहीं. भवजाळीं न फसावा, स्वत्पदीं विसावा असावा.

अर्थः—हे परमेश्वरा, मनामध्यें विषयवासना न यावी आणि जीव वाईट कामें करण्याकरितां भ्यावा. हे देवादिदेवा, जो तूं या सृष्टीचें पालन करितोस, तो तूं माझें संरक्षण कर. हा संसारसमुद्र तरून जाण्यास वाट फार कठीण आहे. तेव्हां सांकडें दुसरा कोण बरें दूर करणार आहे? अर्थात कोणी नाहीं. तुझ्यावांचून यांतून वाट दाखविणारा असा हुशार कोणी नाहीं. या संसाररूपी जाळ्यांत मी कधींही फसला जाऊं नये. तुझे चरणकमळीं मला नेहमी विश्रांति मिळो, हीच मी मनात इच्छा करित आहें.

धडा १५ वा.

श्लोक.

स्तुती करावी परमेश्वराची ॥ करूं नये व्यर्थ कधीं नराची ॥
स्तुतीस कीं ईश्वर पात्र होतो ॥ तसा तिला मानव काय होतो ॥१॥

अन्वयः—परमेश्वराची स्तुती करावी. नराची (स्तुति)

व्यर्थ कवीं करूं नये. कीं (जसा) ईश्वर स्तुतीस पात्र होतो, तसा तिला मानव होतो काय?

अर्थः–ईश्वराचें नेहमीं स्मरण करावें. कारणा शिवाय मनुष्याचे गुणानुवाद वर्णन करणें फुकट आहे. कारण, ईश्वर जसा स्तवन करण्याला योग्य आहे, तसा मनुष्य आहे काय? (नाहीं.)

डोळ्यांनीं बघतों, ध्वनीं परिसतों, कानीं पदीं चालतों ॥
जिव्हेनें रस चाखतों, मधुरही वाचे अम्ही बोलतों ॥
हातांनीं बहुसाळ काम करितों विश्रांतिही घ्यावया ॥
घेतों झोंप सुखें फिरोनि उठतों, ही ईश्वराची दया ॥ २ ॥

अन्वयः–अम्ही डोळ्यांनीं बघतों, कानीं ध्वनीं परिसतों, पदीं चालतों, जिव्हेनें रस चाखतों, वाचे मधुरही बोलतों, हातांनीं बहुसाळ काम करितों, विश्रांतिही घ्यावया, सुखें झोंप घेतों, फिरोनि उठतों, ही ईश्वराची दया (आहे.)

अर्थः–आम्ही आपल्या डोळ्यांनीं सर्व कांहीं पाहतों, कानांनीं शब्द ऐकतों, पायांनीं एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जातों, जिभेनें कोणत्याही पदार्थाची चव जाणतों, वाणीनें गोड बोलतों, हातांनीं नानाप्रकारचीं कामें करितों, व जीवाला समाधान वाटण्याकरितां सुखानें झोंप घेतों व जागृत होतों. या सर्व गोष्टींस कारण एक परमेश्वरकृपा आहे, म्हणजे ईश्वराच्या कृपेनें सर्व कांहीं चाललें आहे.

सर्वज्ञा परमेश्वरा सकरुणा बापा दयासागरा ॥
आम्हीं अज्ञ मुलें तुझीं सकलही तूं बाप होशी खरा ॥
केला कां इतुका अम्हांवरी तुवां देवा असा कोप हा ॥
हें आम्ही करुणस्वरें विनवितों आम्हांकडे तूं पहा ॥ ३ ॥

अन्वयः–(हे) सर्वज्ञा सकरुणा दयासागरा बापा पर-

मेश्वरा, आम्हीं सकळही तुझीं अज्ञ मुलें तूं खरा बाप होशी. (हे) देवा तुवां अम्हांवरी असा हा इतका कोप कां केला हें आम्ही करुणस्वरें विनवितों तूं आम्हांकडे पहा.

अर्थः—हे सर्वकांहीं जाणणाऱ्या देवा, तुझे ठिकाणीं आम्हांविषयीं करुणा असून तूं केवळ दयेचा सागरच आहेस, आम्हीं हीं सर्व तुझीं अज्ञान बालकें आहोंत. आमचा खरो-खर बाप म्हणून जो तो तूंच आहेस. असें असून तूं अशा प्रकारचा इतका आम्हांवर कां रागावलास? हें आम्हीं तुला दीनवाणीनें विचारितों तर तूं आम्हांकडे कृपादृष्टी कर.

आस ही तुझी फार लागली ॥ दे दयानिधे बुद्धि चांगली ॥
देउं तूं नको दुष्टवासना ॥ तूंचि आवरी माझिया मना ॥ ४ ॥

अन्वयः—दयानिधे, तुझी आस ही फार लागली, तूं चांगली बुद्धि दे. तूं दुष्टवासना देऊं नको. माझिया मना तूंचि आवरी.

अर्थः—हे कृपासागरा परमेश्वरा, तुझी आशा आह्मास फार लागली आहे. तूं आह्मांस चांगली बुद्धि दे. वाईट इच्छा मनांत येऊं देऊं नको आणि वाईट वासनांपासून माझ्या मनाचें तूंच आकलन कर.

देह देउनी तूंच रक्षिशी ॥ अन्न देउनी तूंच पोषिशी ॥
बुद्धि देउनी काम सांगशी ॥ ज्ञान देउनी तूंच तारिशी ॥ ५ ॥

अन्वय—तूंच देह देऊनी रक्षीसी. तूंच अन्न देऊनी पोषिशी, (तूंच) बुद्धि देऊनी काम सांगशी (आणि) ज्ञान देऊनी तूंच तारिशी.

अर्थः—हे दीनदयाळा परमेश्वरा, हें शरीर तूंच आह्मांस देतोस व त्याचें रक्षणही तूंच करितोस. तसेंच आह्मांस अन्न देऊन तूंच पाळितोस. त्याचप्रमाणें नीति देऊन

कामही तूंच सांगतोस. आणि अक्कल देऊन तूंच आह्मांस संकटकाळीं त्यांतून सोडवितोस.

माणसें अम्हीं सर्व लेकरें ॥ मायबाप तूं हें असें खरें ॥
तुझिया कृपेवीण ईश्वरा ॥ आसरा अम्हां नाहिं दुसरा ॥ ६ ॥

अन्वयः-(हे) ईश्वरा आह्मीं सर्व माणसें (तुझीं) लेकरें (आणि) तूं मायबाप हें खरें असे. तुझिया कृपेवीण आह्मां दूसरा आसरा नाहीं.

अर्थः-हे जगच्चालका देवा, आह्मीं हीं एकंदर मनुष्यें तुझी मुलें आहोंत आणि तूं आमचा आईबाप आहेस, हें अगदीं खरें आहे. देवा, तुझ्या दयेवांचून आह्मांस दुसरा आधार नाहीं.

धडा २० वा.

व्हावी मज देवा । नित्य तुझी सेवा । लोभें हाच द्यावा । वर मातें॥१॥
थोर तुझी शक्ति । थोरच संपत्ती । सर्व विश्व कीर्ती । गाई तुझी ॥२॥
चंद्र सूर्य तारे । तेजःपुंज सारे । भांडारींचे हिरे । देवा तुझ्या ॥ ३ ॥
देवा मज नाहीं । बुद्धि तरी कांहीं । अज्ञानप्रवाहीं । वाहतों मी ॥ ४॥
दुष्टवासनांहीं । चित्त शुद्ध नाहीं । पापमळीं पाहीं । नाहतों मी ॥ ५ ॥

अन्वयः-(हे) देवा मज तुझी सेवा नित्य व्हावी, हाच मातें लोभें वर द्यावा. तुझी शक्ति थोर, (तसेंच) संपत्ती थोरच (अशी) सर्व विश्व तुझी कीर्ती गाई. चंद्र, सूर्य (आणि) तेजःपुंज तारे (हे) सारे देवा तुझ्या भांडारींचे हिरे (आहेत). देवा मज तरी कांहीं बुद्धि नाहीं, मी अज्ञानप्रवाही वाहतों. (माझें) चित्त दुष्टवासनांहीं, शुद्ध नाहीं, मी पापमळीं नाहतों पाहीं.

अर्थः-हे जगन्नियंत्या देवा, तुझी चाकरी मजकडून निरंतर घडावी, हाच कृपाळूपणानें मजला वर द्यावा. तुझा पराक्रम मोठा, तसेंच तुझें धनही अपार आहे, असें त्रिभुवन

वर्णन करित आहे. चंद्र, सूर्य आणि जे देदीप्यमान तारे (नक्षत्रें) हीं सर्व तुझ्या खजिन्यांतील रत्नें आहेत. देवा, मजला तर जरा सुद्धां मति नाहीं, मी अज्ञानरूपी ओघांत वहात आहे. नानाप्रकारच्या कल्पनांनीं माझें मन दोषी झालें आहे. पापरूप चिखलांत मी आंघोळ करीत आहे. इकडे तूं पहा. (म्हणजे अशा प्रकारची माझी स्थिति आहे यांतून तूं मला तार, असा भावार्थ).

मजवरी देवा। लोभ असों द्यावा ॥ मजला विसांवा। अन्य कोण ॥६॥
मज दीनावरी। नित्य कृपा करीं ॥ संकटें निवारीं। देवा माझीं ॥७॥
आहे निराधारी। मज घे पदरीं ॥ आपुलासा करीं। मज देवा ॥८॥
मातेसम बाळा। कोण करी लळा ॥ प्रेमें घेई गळां। सर्वकाळ ॥९॥
शरण तुला मी। आलों भावें स्वामी ॥ आश्रय नेहमीं। द्यावा मातें ॥१०॥

अन्वयः–देवा मजवरी लोभ असों द्यावा. मजला विसांवा अन्य कोण (आहे.)? देवा मज दिनावरी कृपा नित्य करीं. देवा माझीं संकटें निवारीं. निराधारी आहे मज पदरीं घे (आणि) देवा मज आपुलासा करीं. मातेसम कळा बाळा कोण करी. प्रेमें सर्वकाळ गळां घेई स्वामीं मी तुला भावें शरण आलों. मातें नेहमीं आश्रय द्यावा.

अर्थः–हे देवा, माझ्यावर नेहमी लोभ ठेव. मला तुझ्या-वांचून दुसरें विश्रांतिस्थान कोणतें आहे? देवा, मज गरि-बावर नेहमीं कृपा कर. मला तूं पदरांत घे आणि आपलासा करून सोड. मजवर नेहमीं ममता कर, आई-सारखा मुलाचे लाड पुरविणारा दुसरा कोण आहे? एक तूंच. हे अनाथाच्या नाथा, मी तुला शुद्ध अंतःकरणें विनवीत आहें, तरी मला सर्वकाळ आपल्याजवळ आश्रय द्यावा, हेंच मागतों.

धडा ३१ वा. उपदेश. आर्या.

सत्य सदा बोलावें, सांगे गुरु आणि आपुला बाप ॥
खोटें भाषण करणें, सज्जन म्हणतात हें महा पाप ॥ १ ॥

अन्वयः–सदा सत्य बोलावें, खोटें भाषण करणें हें सज्जन महापाप म्हणतात (असें) आपला गुरु आणि बाप सांगे.

अर्थः–नेहमीं खरें बोलावें, खोटें बोलणें शहाणे लोक मोठें पातक आहे असें समजतात, असें आपला बाप आणि शिक्षक सांगतात.

दिधलें दुःख परानें, उसनें फेडूं नयेचि सोसावें ॥
शिक्षा देव तयाला, करिल म्हणोनी उगीच बैसावें ॥ २ ॥

अन्वयः–परानें दुःख दिधलें (तरी) उसनें फेडूं नयेची (तें) सोसावें. (कारण) तयाला देव शिक्षा करिल म्हणोनी उगीच बैसावें.

अर्थः–दुसऱ्यानें जरी आपणांस दुःख दिलें तरी आपण त्याला देऊं नये; तें त्यानें दिलेलें दुःख आपण सहन करावें; कारण त्याला त्याबद्दल शासन करणारा देव आहे; म्हणून उगीच बसावें.

जो जो निजहितकर्ता, त्याची त्याची करा तुम्ही सेवा ॥
देवासमान मानुनि, त्याचा सन्मान मानसीं ठेवा ॥ ३ ॥

अन्वयः–जो जो निजहितकर्ता (असेल) त्याची त्याची तुम्ही सेवा करा. त्याला देवासमान मानुनि मानसीं त्याचा सन्मान ठेवा.

अर्थः–जो जो म्हणून तुमचें कल्याण करणारा असेल, त्याची तुम्ही चाकरी करा, आणि देवास जसा तुम्हीं पूज्य मानतां, तसा त्यालाही पूज्य मानून, आपल्या हृदयांत त्याच्याविषयीं चांगली बुद्धि राखा.

नम्रपणें सर्वांशीं, वागावें यांत फार लाभ असे ॥
उद्धतपणांत कांहीं, लाभ, जनप्रेम, सख्य, सौख्य नसे ॥ ४ ॥

अन्वयः—सर्वांशीं नम्रपणें वागावें यांत फार लाभ असे. उद्धतपणांत लाभ, जनप्रेम, सख्य, सौख्य कांहीं नसे.

अर्थः—सर्वांबरोबर लीनपणाचें वर्तन ठेवणें यांत पुष्कळ लाभ आहे; दांडगाईनें वागण्यांत कांहींही प्राप्ति नाहीं; तसेंच लोकप्रीतिही नाहीं, मैत्रीही नाहीं व सुखही नाहीं.

मोठेपण दुसऱ्याला, देशील जरी तरीच तूं मोठा ॥
मी मोठा म्हणतो जो त्याचा मोठेपणा असे खोटा ॥ ५ ॥

अन्वयः—जरी दुसऱ्याला मोठेपण देशील तरीच तूं मोठा. जो मी मोठा (असें) म्हणतो, त्याचा मोठेपणा खोटा असे.

अर्थः—जर तूं दुसऱ्याला थोरपणा देऊन त्याचा सत्कार केलास, तरच तूं मोठा (उत्तम) खरा. जो स्वतः आपण आपला थोरपणा वाखाणितो, त्याचा तो थोरपणा फुकट आहे.

मी विद्वान्, मी धनवान्, मी बलवान्, मी समर्थ, मी मोठा॥
हा अभिमान नसावा, असल्या होईल बा तुझा तोटा ॥ ६ ॥

अन्वयः—कवितेप्रमाणेंच. मात्र दुसऱ्या चरणांतील 'बा' हें पद प्रथम घ्यावें, व होईल हें क्रियापद शेवटीं घ्यावें.

अर्थः—मी मोठा जाणता, मोठा पैसेवाला, मोठा सामर्थ्यवान, मोठा वरिष्ठ, असा मीपणा कधींहि बाळगूं नये; कारण जर असा मीपणा बाळगशील तर, तुझा त्यांत फार तोटा आहे.

मन न दुखवि परावें, बोले मधुर त्यजूनियां गर्व ॥
परहितनिरत असे जो, तो मोठा सभ्य वदति जन सर्व ॥ ७ ॥

अन्वयः—जो परावें मन न दुखवि, गर्व त्यजूनियां मधुर बोले, परहितनिरत असे तो मोठा सभ्य (असें) सर्व जन (त्या) वदती.

अर्थः—जो मनुष्य दुसऱ्याचें मन कोणत्याही प्रकारें दुखवित नाही, म्हणजे त्याला वाईट वाटण्यासारखें करीत नाहीं, गर्व सोडून जो गोड भाषण करितो आणि दुसऱ्याचें हित साधण्याविषयीं तत्पर असतो, अशा प्रकारच्या गुणांनीं मंडित, तो उत्तम प्रकारें सभ्य रीतीनें वागणारा, असें सगळे लोक त्याला म्हणतात.

थोर असो नीच असो, अडल्याविडल्यास हात लावावा ॥
गरिबास साह्य व्हावें, सूज्ञें चुकल्यास मार्ग दावावा ॥ ८ ॥

अन्वयः—सूज्ञें, थोर असो, नीच असो, अडल्याविडल्यास हात लावावा. गरिबांस साह्य व्हावें, चुकल्यास मार्ग दावावा.

अर्थः—चांगल्या शहाण्या माणसानें, प्रसंगीं मोठा श्रीमंत असला अथवा गरीब असला आणि जर तो प्रसंगांत आहे तर त्यास हातभार लावावा; तसेंच गरीब लोकांस मदत करावी आणि रस्ता चुकलेल्या मनुष्यास रस्त्यास लावावें.

जो नर परोपकारी त्याच्या पुण्यास त्या नसे गणती ॥
थोर असो, नीच असो, तो धन्य असेंच लोक त्या म्हणती॥९॥

अन्वयः—जो नर परोपकारी त्याच्या पुण्यास गणती नसे. तो थोर असो (किंवा) नीच असो त्या धन्य असेंच, लोक म्हणती.

अर्थः—जो पुरुष दुसऱ्यावर उपकार करणारा असतो, त्याच्या पुण्याईला सीमा नाहीं. मग तो श्रेष्ठ प्रतीचा असो किंवा हलक्या प्रतीचा असो, तो वर्णनीय असें लोक त्याला म्हणतात.

शक्त्यनुसार करावा, दीनावरि अल्प थोर उपकार ।
कीं त्या सत्कर्माचा, देवावर निश्चयें पडे भार ॥ १० ॥

अन्वयः—दीनावरीं शक्त्यनुसार अल्प, थोर उपकार करावा कीं, त्या सत्कर्माचा भार देवावर निश्चयें पडे.

अर्थ:—आपल्या शक्तीप्रमाणें गरीबावर थोडीबहुत दया करावी कीं, जेणेंकरून या केलेल्या चांगल्या कृत्यांचें ओझें देवावर खात्रीनें पडेलच.

धडा ३७ वा.

श्लोक.

जसा वर्ततो लोककल्याणकारी ।
जगीं वर्तती लोकही त्या प्रकारीं ॥
वदे तो सदाचार शास्त्रार्थ जेसे ।
जगीं वर्तती लोकही सर्व तैसे ॥

अन्वय:—जसा लोककल्याणकारी वर्ततो, त्या प्रकारीं जगीं लोकही वर्तती. तो जैसे सदाचार शास्त्रार्थ वदे, तैसे सर्व लोकही जगीं वर्तती.

अर्थ:—ज्याप्रमाणें लोकांचें कल्याण करणारा वागतो त्याचप्रमाणें या जगांत लोकही वागतात. तो जसा, चांगले आचारविचार किंवा शास्त्राच्या गोष्टी सांगतो, त्याचप्रमाणें सृष्टींतील लोकही वर्तन करितात.

भल्याच्या संगानें अवगुण असे तो गुण दिसे ।
खळाच्या संगानें सुगुण तरि तो लोपत असे ॥
जसें खारें पाणी पिउनि घन ते गोड करिती ।
फणी दुग्धातेंही पिऊनी गरळातेंचि वमती ॥ २ ॥

अन्वय:—(जो) अवगुण असे तो भल्याच्या संगानें गुण दिसे. जसें घन खारें पाणी पिउनि तें गोड करिती. तरी तो सुगुण खळाच्या संगानें लोपत असे. जसें फणी दुग्धातें पिउनिही गरळातेंचि वमती.

अर्थ:—ज्याप्रमाणें मेघ समुद्राचें खारें पाणी पिऊन आपल्यास पर्जन्यकाळीं गोड पाण्याची वृष्टि करितात. त्याप्रमाणें वाईट गुण या चांगल्या माणसाच्या सहवासानें चांगला गुण सा

दिसतो. आणि तोच सुगुण असला आणि जर त्याला दुष्टांची संगत घडली आहे, तर तो गुण, ज्याप्रमाणें सर्प दूध पिऊनही विषच ओकतात, तसा नाहींसा होतो.

चांगल्या सर्वें संगती धरीं । त्यामुळें जगीं मान्यता खरी ॥
अन्यथा तुला कोण मानिल । योग्यता तुझी कैशी होइल ॥ ३ ॥

अन्वयः—चांगल्या सर्वें संगती धरीं, त्यामुळें जगीं खरी मान्यता (मिळेल), तुला अन्यथा कोण मानील? तुझी योग्यता कैशी होईल?

अर्थः—भल्या माणसाबरोबर सहवास करावा, त्या योगानें या जगतामध्यें तुला खरी योग्यता आहे, नाहींतर तुला कोण मान देणार आहे आणि तुझा मोठेपणा कसा होईल?

धरूं नका तुम्ही दुष्ट वाट ती । जरि तुम्हांस ती गोड वाटती ।
करिल नाश ती हें धरा मनीं । करूं नका हसूं आपुलें जनीं ॥४॥

अन्वयः—तुझांस जरी ती गोड वाटती (तरी) ती दुष्ट वाट तुम्हीं धरूं नका. ती नाश करिल हें मनीं धरा जनीं आपुलें हंसूं करूं नका.

अर्थः—तुम्हांस जरी ती म्हणजे वाईट वाट, गोड वाटते, तथापि तो घातक मार्ग तुम्हीं स्वीकारूं नका. कारण ती आपल्या नाशास कारण आहे, हें तुम्हीं मनामध्यें पक्कें बागवा आणि ती धरून आपलें या जगतामध्यें हंसें करून घेऊं नका.

स्मरा नित्य देवा करा मातृसेवा । धरा सुस्वभावा त्यजा वैरभावा ॥
असें केलिया सौख्य तुम्हांस आहे । म्हणूनीच मी नित्य बोधीत आहे ॥५॥

अन्वयः—(तुम्हीं) देवा नित्य स्मरा. मातृसेवा करा सुस्वभावा धरा. वैरभावा त्यजा. तुम्हांस असें केलिया सौख्य आहे म्हणूनच मी नित्य बोधित आहें.

अर्थः—तुम्हीं निरंतर परमेश्वराचें स्मरण करीत असा;

तशीच आपल्या आईची सेवा करा ; उत्तम प्रकारचा स्वभाव धरा ; दुष्ट स्वभाव टाका ; असें केल्यापासून तुम्हांस सुख होईल आणि याकरितांच मी तुम्हांस बोध करीत आहें.

आर्या.

तुमचें वय हें आहे केवळ विद्या शिकून असण्याचें ॥
चित्तीं धरुनि ऐसें, टाकुनि द्यावें उगीच फिरण्याचें ॥ ६ ॥

अन्वयः—हें तुमचें वय केवळ विद्या शिकून असण्याचें आहे. ऐसें चित्तीं धरुनि उगीच फिरण्याचें टाकूनि द्यावें.

अर्थः—मुलांनीं तुमचें हें हल्लींचें आयुष्य ह्मणजे लहानपण, फक्त विद्या शिकण्याचे उपयोगाचेंच आहे, हें तुम्ही मनांत बाळगून उगीच रिकामें फिरण्याचें टाकून द्या.

विद्यालयीं मुलानें, जाण्याचा नित्य वेळ साधावा ॥
मनिं नित्य वागवावें, गुरुचा मज बोल तो न लागावा ॥७ ॥

अन्वयः—मुलानें विद्यालयीं जाण्याचा वेळ नित्य साधावा. तो गुरुचा बोल मज न लागावा (हें) नित्य मनिं वागवावें.

अर्थः—प्रत्येक मुलानें शाळेंत जाण्याची वेळा नेहमीं साधावी, ह्मणजे कधींही शाळेची वेळा विनाकारण चुकवूं नये. आणि नेहमीं ध्यानांत असें बाळगावें कीं, शिक्षकाचा शब्द मला कधींही लागूं नये.

धडा ४४ वा. प्रार्थना.

देवा परमसमर्था, दीनदयाळा प्रभो जगन्नाथा ॥
आलों शरण तुला मी, दीन तुझ्या ठेवितों पदीं माथा ॥ १ ॥

अन्वयः—परमसमर्था, दीनदयाळा जगन्नाथा, प्रभो देवा, मी दीन तुला शरण आलों, तुझ्या पदीं माथा ठेवितों.

अर्थः—हे सर्वशक्तिमान व गरीबांवर दया करणाऱ्या व

पृथ्वीचें पालन करणाऱ्या प्रभो, मी गरीब तुला नम्र होऊन तुझ्या पायांवर मस्तक ठेवित आहें.

साकी.

चुकलों बहु तरि देवा माझा नच अव्हेर करावा ॥
क्षमा करावी दीनवत्सला चित्तीं लोभ धरावा ॥ २ ॥

अन्वयः—देवा (मी जरी) बहु चुकलों तरी माझा अव्हेर नच करावा. दीनवत्सला क्षमा करावी (आणि) चित्तीं लोभ धरावा.

अर्थः—ईश्वरा, जरी माझ्या हातून फार चुका घडल्या तरी मला टाकू नका. हे गरीबांवर ममता करणाऱ्या प्रभो, त्या चुकांची मला माफी करून, माझ्यावर लोभ करा.

थोर पराक्रम थोर तुझें यश थोर दया देवाजी ।
तुजपाशीं मी नच मागें गज न म्हणें कीं दे वाजी ॥ ३ ॥

अन्वयः—देवाजी (तुझा) पराक्रम थोर, तुझें यश थोर (तुझी) दया थोर (आहे). मी तुजपाशीं गज नच मागें कीं म्हणें वाजी दे.

अर्थः—ईश्वरा, तुझा मोठेपणा थोर आहे. तसेंच तुझी कीर्तिही मोठी आहे. तसेंच तुझी दयाही मोठी आहे. दयाळा तुझ्यापाशीं मी हत्ती मागत नाहीं, अथवा मला घोडा दे असेंही म्हणत नाहीं.

श्लोक.

देवा तुझ्या मी नमितों पदातें ।
जें वारितें सर्वहि आपदातें ॥
तारीं मला दीनसख्या अनाथा ।
ठेवीं तुझ्या सन्निध विश्वनाथा ॥ ४ ॥

अन्वयः—देवा, जें सर्वही आपदातें वारितें (अशा)

तुझ्या पदातें मी नमितों. दीनसख्या मला अनाथा तारीं.
विश्वनाथा तुझ्या सन्निध ठेवीं.

अर्थः—ईश्वरा, जें सकल दुःखाचा नाश करितें अशा तुझ्या पदकमलातें मी नमस्कार करितों. गरिबाच्या कनवाळू देवा, मला निराश्रितास रक्षण कर; जगदीशा, आपल्या जवळ मला ठेव, मी हेंच मागतों.

पळोपळीं मीं बहु पातकें करीं । तथापि त्यांची प्रभु तूं क्षमा करीं ॥
दयाघना मी अति दीन लेंकरूं । न तारिशी तूं तरि काय मीं करूं ५

अन्वयः—(हे) प्रभु मी पळोपळीं बहु पातकें करीं तथापि तूं त्यांची क्षमा करीं. दयाघना, मी अति दीन लेंकरूं (आहें) (जरी) तूं न तारिशी तरी मीं काय करूं ?

अर्थः—ईश्वरा, मी प्रत्येक क्षणोक्षणाचे ठिकाणीं फार पातकें करितों, तरी दयाळा तूं त्यांची क्षमा कर; कृपासागरा, मी अगदीं गरीब तुझें बाळक आहें. आणि जर तूं माझें रक्षण करणार नाहींस तर मी काय बरें करावें.

दिंडी.

कृपासागर तूं असिसि जगन्नाथा । नम्र करितों मी चरणिं तुझ्या माथा ॥
असे पापी मी पतित दुराचारी । तूंचि होउनि बा सदय मला तारीं ६

अन्वयः—जगन्नाथा तूं कृपासागर असिसि, मी तुझ्या चरणीं माथा नम्र करितों, मी पापी पतित दुराचारी असें. बा सदय होउनि तूंचि मला तारीं.

अर्थः—विश्वपालका, तूं दयेचा समुद्र आहेस. मी तुझ्या पायीं माथा ठेविलों. मी वाईट प्रकारचें आचरण करणार असा भ्रष्ट पातकी आहें. बा देवा, तूंच दयाळू होऊन माझें रक्षण कर.

समाप्त.

पोतदारांचीं नीतिप्रद व मनोरंजक

पुस्तकांचीं नांवें.	किंमत.		
करुणराघव—(उत्तररामचरित्र)	१	[illegible]	[illegible]
ललितवत्सराज (पूर्वार्ध)—(रत्नावली) ...	०	०	[illegible]
ललितवत्सराज (उत्तरार्ध)—(प्रियदर्शिका)	०	८	[illegible]
चारुदत्त आणि वसंतसेना—(मृच्छकटिक)	१	०	०
प्रणयिमाधव—(मालतीमाधव)	१	०	०
आर्यचाणक्य—(मुद्राराक्षस)	१	०	०
दिव्यपुरूरवा—(विक्रमोर्वशी)	०	१४	०
राजा अग्निमित्र—(मालविकाग्निमित्र) ...	१	०	०
शिवविजय अथवा तरुण शिवाजी नाटक	१	०	०
सुंदरी आणि वसंतसेन—भाग १	०	४	०
सुंदरी आणि वसंतसेन—भाग २	०	६	०
सुंदरी आणि वसंतसेन—भाग ३	०	१०	०
सद्गुणी सगुणा (स्त्रियांस वाचण्याजोगें) पृष्ठें ६०..	०	४	०
सौदामिनी अथवा दुर्दैवी सून. पृष्ठें १६०...	०	१२	०
भुवनसुंदरी (नवीन कल्पित कादंबरी) ...	१	०	०
महात्मा गोविंदराय (एका सुखी कुटुंबाची हकीकत)	०	३	०
संगीत [illegible]नाटक, किर्लोस्करांचे चालीवर.	०	८	०
मनोहर नाटक—पृष्ठें १८० (सुखपर्यवसायी)...	०	१२	०
सुंदराबाई (एक चटकदार लहानशी गोष्ट) ...	०	१	०
आयुर्वेद[illegible]—भाग १, २, ३, ४ प्रत्येकाची ...	०	०	६
विनोदपर गोष्टी भाग १ ला, पृष्ठें (१००)...	०	४	६
विनोदपर गोष्टी भाग २ रा, पृष्ठें (१००)...	०	४	६
विनोदपर गोष्टी भाग ३ रा, पृष्ठें (१००)...	०	८	०

ऐतिहासिक व शास्त्रीय पुस्तकें.

ऐतिहासिक पोवाडे (अस्सल व [illegible])	१	८	०
[illegible] यांचें चरित्र—२ री आवृत्ति ...	०	१२	०
[illegible] आणि पापी (अतीव उपयोगी पुस्तक) ...	०	८	०
[illegible] (हिंदुस्थानची एक भावी कल्याणी) निबंध.	०	३	०
[illegible] (नवीन निबंध) ...	०	१	६

[illegible]ची धर्मविषयक पुस्तकमाला.

[illegible] सुटी पोथी ८ आणे, रेशमी पोथीस किंमत १२ आणे.
[illegible]थी मोठ्या अक्षरांची ... ...कि० १० आणे.
[illegible] अध्याय २८ ...कि० २ रुपये.
[illegible]—अध्याय ३६. ...कि० १॥ रुपया.
[illegible]पूजा सटिप्पणी सार्थकथा च ...कि० ४ आणे.
[illegible]पूजा सटिप्पणी सार्थकथा च ...कि० ४ आणे.
हरितालिकापूजा सटिप्पणी सार्थकथा च ...कि० २ आणे.
[illegible] (वैभव) पूजा सटिप्पणी सार्थकथा च ...कि० ४ आणे.
[illegible]पूजा सटिप्पणी सार्थकथा च ...कि० २ आणे.
अनंतचतुर्दशीपूजा सटिप्पणी सार्थकथा च ...कि० ४ आणे.
[illegible]पूजा सटिप्पणी सार्थकथा च ...कि० ७ आणे.
[illegible] प्राकृत ओवीबद्ध श्रीधरकृत ...कि० ४ आणे.
एकादशीमहात्म्य ओवीबद्ध अध्याय ३ ... ...कि० ३ आणे.
[illegible] पुराणोक्त [illegible] २ री आवृत्ति ...कि० २४ आणे.

पोतदारांची पुराणोक्त कथासारपुस्तकमाला.

(सरळ गोष्टीच्या रूपाने)

पु० नांवें.	कि० आ.	पै.	पु० नांवें.	कि० आ.	पै.
श्रीदत्तजन्मचरित्र ...	१	०	चंद्रिकाचरित्र ...	१	[illegible]
[illegible] चरित्र ...	१	०	[illegible]चरित्र ...	१	६
[illegible]कथासार.	१	६	साधु [illegible] चरित्र.	१	०
[illegible]कथासार	२	०	[illegible]चरित्र ...	१	६
प्रल्हादचरित्र ...	१	०	[illegible]चरित्र ...	४	६
[illegible]कथासार ...	१	०	[illegible]चरित्र ...	४	६
[illegible] चरित्र ...	१	६	[illegible] गोष्टी भाग		
[illegible] चरित्र	१	०	१ ला, पृष्ठे (१००).	४	
[illegible]चरित्र ...	१	०	पुराणांतील गोष्टी भाग		
[illegible]चरित्र ...	४	०	२ रा, पृष्ठें (१००).	४	
[illegible] गोष्ट ...	१	०	पुराणांतील गोष्टी भाग		
[illegible]चरित्र ...	१	०	३ रा, पृष्ठें (१००).	४	